सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०१ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२० पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## 'वन ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेकडे महाराष्ट्राची वेगाने वाटचाल - मुख्यमंत्री

मुंबई : भारताने पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्याची उद्दिष्ट ठेवले आहे. त्यात महाराष्ट्राने सिंहाचा वाटा उचलला असून अर्थव्यवस्था ' वन ट्रिलियन डॉलर' करण्यासाठी राज्याची वेगवान वाटचाल सुरू असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशियाई पायाभूत सोयी सुविधा गुंतवणूक बँकेने २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेच्या इन्व्हेस्टमेंट सोल्युशनचे उपाध्यक्ष अजय कुमार पांडे यांच्या समवेत सह्याद्री अतिथी गृह येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, विकसित महाराष्ट्राचा आराखडा तीन टप्प्यात तयार करत आहोत. यामध्ये अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवण्यात आले आहेत. राज्यात पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची एक पाइपलाइन तयार करत आहे. यात अनेक वित्तीय संस्थांची मदत लागणार आहे. या प्रकल्पांसाठी आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँक सारखी संस्था स्वतःहून महाराष्ट्राच्या क्षमता ओळखून राज्याच्या पाठीशी असल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी यावेळी आनंदही व्यक्त केला.



राज्यातील ९ मोठे प्रकल्प नीती आयोग व वित्त मंत्रालयाला सादर करण्यात आले आहेत. राज्यामध्ये नदीजोड प्रकल्पाची मोठ्या प्रमाणात आखणी करण्यात आली आहे, त्यासाठी सुद्धा वित्तसहाय्य लागणार आहे. राज्यात पाच नदी जोड प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणणारा वैनगंगा- नळगंगा - पैनगंगा नदीजोड प्रकल्पाचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पाचा लाभ केवळ शेतीलाच होणार नसून उद्योगधंद्यांनाही होणार आहे. यासोबतच दमणगंगा - गोदावरी नदी जोड प्रकल्पामुळे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यातल्या गोदावरी खोऱ्यात आणण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पंप स्टोरेज योजनेच्या माध्यमातून एक लाख मेगापॅड ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पंप स्टोरेज क्षेत्रात अनेक खाजगी कंपन्या सुद्धा आहेत. त्या कंपन्यांना बँकेशी जोडून देण्यात येईल. शेवटी यातून विकसित महाराष्ट्राला मोठी मदत होणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री फडणवीस यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांसाठी सौर उर्जे चे अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यासाठी राज्याला बँकेची मदत लागणार आहे. सौर उर्जेवर आधारित कृषी पंप लावण्यासाठी युद्ध पातळीवर योजना राबविण्यात येत आहे. सौर ऊर्जेवर आधारित पंप योजनेची योजना देशासाठी दिशादर्शक ठरली असून अन्य राज्यांमध्येही त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रत्येक वर्षी तीन ते चार लाख कृषी पंप सौरऊर्जे वर आधारित लावण्यात येणार आहे. शहरांमध्ये गतिमान दळण वळणसाठी भुयारी व उन्नत मेट्रो, भुयारी मार्ग, सागरी किनारा रस्ता आदी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष श्री पांडे यांनी बँकेचे आशिया आणि जगात चालू असलेल्या प्रकल्पांबाबत माहिती दिली.

## विकास खारगे यांनी स्वीकारला महसूल विभागाचा पदभार

मुंबई : मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव हा पदभार स्वीकारला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

खारगे यांच्याकडे यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अपर मुख्य सचिव पदाचा कार्यभार होता. तत्पूर्वी त्यांनी राज्य शासनाच्या विविध विभागांत महत्त्वपूर्ण पदांवर काम केले आहे. महसूल विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी विभागाच्या कामाचा तसेच पुढील कामाच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला. समाजातील शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी कायद्यांमध्ये बदल करायचा झाल्यास तो अवश्य करण्यात येईल. जाणीवपूर्वक झालेला कोणताही गैरप्रकार स्वीकारला जाणार नाही, असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.




## राज्यातील आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये सुधारित आरक्षण लागू

मुंबई : सरकारने आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांसाठी सुधारित आरक्षण आणि बिंदूनामावली निश्चित केली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने जारी करण्यात आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आरक्षण उपसमितीने याबाबत केलेल्या शिफारशीनंतर ही बिंदूनामावली निश्चित करण्यात आली आहे.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाच्या आरक्षणासह नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांसाठी सुधारित आरक्षण विहित करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचवण्यासाठी महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली होती. या समितीमध्ये अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक ऊईके आदींचा समावेश होता. या उपसमितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने हा निर्णय घेतला आहे. या आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये ही आरक्षण बिंदूनामावली लागू करण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमधील इतर मागास वर्ग, तसेच विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्गाची प्रचलित आरक्षणाची टक्केवारी आणि लोकसंख्या विचारात घेऊन गट-क आणि गट-ड संवर्गातील सरळसेवा भरतीसाठी सुधारित आरक्षण निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर या सुधारित आरक्षणानुसार बिंदूनामावली देखील विहित करण्यात आली होती. राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) प्रवर्गास शासकीय सेवेतील सरळसेवा पदभरतीस तसेच शैक्षणिक संस्थांतील प्रवेशास १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. नाशिक, धुळे, नंदुरबार आणि पालघर जिल्ह्यांसाठी आरक्षण : नाशिक, धुळे, नंदुरबार आणि पालघर या प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जातींसाठी १०% , अनुसूचित जमातींसाठी २२% , विमुक्त जाती (अ) साठी ३% , भटक्या जमाती (ब) साठी २.५% , भटक्या जमाती (क) साठी ३.५% , भटक्या जमाती (ड) साठी २% , विशेष मागास प्रवर्गासाठी २% , इतर मागास वर्गासाठी १५% , एसईबीसीसाठी ८% , ईडब्ल्यूएससाठी ८% आणि खुला प्रवर्गासाठी २४% आरक्षण विहित करण्यात आले आहे.

## भगवा आतंकवाद हा निगेटिव्ह निरेटिव्ह

### खा.डॉ. गोपछडेनी न्यायालयाच्या निर्णयाचे केले स्वागत

नांदेड : मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्वच आरोपींची माननीय न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे . न्यायालयाच्या या निकालाची आम्ही स्वागत करतो . या निकालाने भगवा आतंकवाद निगेटिव्ह नेरेटीव्ह होता हे सिद्ध केले आहे. त्यामुळे कॉंग्रेस सुशील कुमार शिंदे , दिग्विजय सिंह आणि गांधी घराण्याला हा निर्णय मोठी चपराक असल्याचे मत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.

२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव शहरात झालेल्या भीषण बॉम्ब स्फोटाचा आज १७ वर्षांनी मुंबई उच्च न्यायालयाने निकाल नोंदवला आहे. या निकालात साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर आणि अन्य सहा जणांची निर्दोष सुटका करण्यात आलेली आहे . या बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्वच आरोपी निर्दोष सोडण्यात आल्याने न्यायालयाच्या निकालाचे आम्ही स्वागत करतो . तत्कालीन कॉंग्रेस सरकारने आणि माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे , कॉंग्रेसचे नेते दिग्विजय सिंह यांनी हा भगवा आतंकवाद असे वातावरण तयार केले होते. त्यामुळे न्यायालयाच्या आजच्या निकालाने सुशील कुमार शिंदे , दिग्विजय सिंह यांच्यासह गांधी घराणे आणि कॉंग्रेसला मोठी चपराक लगावली आहे. हिंदू हा आतंकवादी होऊ शकत नाही . हिंदूही विचारधारा आहे . हिंदूही उज्वल जीवनाची , जगण्याची परंपरा आणि संस्कृती आहे . ती संपूर्ण मानवी कल्याणाचा विचार करते अशी प्रतिक्रिया ही खा. डॉ. गोपछडे यांनी दिली आहे.

## राज्यात १ ते ७ ऑगस्टदरम्यान महसूल सप्ताह साजरा होणार

अनगर, दि. ३१ - शासनाच्या महसूल विभागामार्फत राज्यभरात 'महसूल सप्ताह - २०२५' चे दि.१ ऑगस्ट ते दि.७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या योजनांची माहिती, लाभ व सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी शासनाने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिली.

सप्ताहाची सुरुवात दि. १ ऑगस्ट रोजी 'महसूल दिना' पासून होणार असून, याप्रसंगी विभागीय व जिल्हास्तरावर महसूल खात्यातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार केला जाईल. तसेच, उत्कृष्ट कामगिरीसाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांना योजनांतील प्रमाणपत्रांचे वाटप, ई-हक्क पोर्टलचा वापर, ऑनलाईन सेवा राबविणे, सेतु केंद्रांमार्फत नागरिकांचे अर्ज स्वीकारणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी विशिष्ट उद्देश ठेवून उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि.२ ऑगस्ट रोजी, २०११ पूर्वीपासून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या पात्र कुटुंबांना अधिकृत पट्टे वाटप करण्यात येतील.

## मुंबईत आता ब्रिटनची 'ब्रिस्टल युनिव्हर्सिटी' येणार!

मुंबई : महाराष्ट्राला जागतिक शिक्षण केंद्र बनवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकत, ब्रिटनच्या प्रतिष्ठित ब्रिस्टल विद्यापीठाने मुंबईत आपले पहिले आंतरराष्ट्रीय कॅम्पस उघडण्याची अधिकृत घोषणा केली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वरून ही आनंदाची बातमी दिली, ब्रिटीश विद्यापीठाच्या उच्च अधिकाऱ्यांसोबत फलदायी बैठक झाल्यानंतर त्यांनी ही घोषणा केली.

फडणवीस यांनी आपला उत्साह व्यक्त करत म्हटले, ब्रिस्टल विद्यापीठाच्या प्रॉ. ज्युडिथ स्क्वेअर्स (कार्यकारी कुलगुरू), प्रॉ. चार्ल फॉल (सहयोगी प्रो व्हीसी - ग्लोबल एंगेजमेंट) आणि लुसिंडा पार (सीओओ आणि रजिस्ट्रार) यांचे स्वागत करताना आनंद होत आहे. त्यांनी मुंबईत त्यांचे पहिले जागतिक कॅम्पस सुरू करण्याच्या योजनांची औपचारिक घोषणा केली आहे. त्यांनी या घडामोडीला महाराष्ट्राच्या जागतिक दर्जाचे शिक्षण केंद्र बनण्याच्या महत्त्वाकांक्षेतील एक महत्त्वाचा क्षण म्हटले. ब्रिस्टल विद्यापीठ, जे युकेमधील एक अग्रगण्य संशोधन संस्था आहे आणि जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये सतत स्थान मिळवते, भारतामध्ये विस्तार करणे हे शैक्षणिक सहकार्याला चालना देण्यासाठी आणि भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शिक्षण संधी प्रदान करण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल मानते. ग्लोबलमहाराष्ट्र या व्यापक दृष्टीकोनाचा हा एक भाग म्हणून साजरा केला जात आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, संशोधक आणि प्रतिभावंतांना आकर्षित करण्याचे राज्याचे उद्दीष्ट पूर्ण होईल.









# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नागपूरच्या अधिकाऱ्याची लातुरात लॉजमध्ये आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
एमपीएससी परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याच्या नैराश्यातून नागपूर येथील ३२ वर्षीय बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याने लातूर शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर असलेल्या एका लॉजवर गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी समोर आली. याबाबत गांधी चौक पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. रामदास मोहन श्रीरामे असे मयताचे नाव आहे.



नांदेडच्या मुखेड तालुक्यातील कमळेवाडी येथील मूळचे रहिवासी असलेले रामदास श्रीरामे हे सध्या नागपूर येथे शासकीय विभागात बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत होते. दरम्यान, ते घरी अमरावती येथे प्रशिक्षणासाठी जात आहे, असे सांगून घराबाहेर पडले होते. सोमवारी लातुरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर असलेल्या एका लॉजवर ते उतरले. त्यांनी येथील २०८ क्रमांकाची खोली बुक केली. पहिल्या दिवशीची रक्कम त्याने लॉज व्यवस्थापकाकडे जमा केली होती.

दरम्यान, मंगळवारी दुसऱ्या दिवशीची रक्कम जमा करण्याबाबत लॉज व्यवस्थापकाने खोलीचे दार ठोठावले. मात्र, आतून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. व्यवस्थापकाला संशय आल्याने त्यांनी तातडीने गांधी चौक पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असता, रामदास श्रीरामे हे गळफास घेतल्याचे आढळून आले. याबाबत सुनीलकुमार शंकरराव जाधव (वय ५६, रा. जेल रोड, बिदर) यांच्या माहितीवरून गांधी चौक पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांनी दिली आहे.




### संक्षिप्त वृत्त...

## खूनप्रकरणी मुलास जन्मठेप, वडील निर्दोष मुक्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत बंदुकीतून गोळी झाडून



खून केल्याच्या आरोप प्रकरणात बुधवारी लातूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी मुलास दहा हजार रुपये दंड आणि जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे तर त्याच्या वडिलाची निर्दोष मुक्तता केली आहे.

लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रकाशनगरात २४ सप्टेंबर २०१९ मध्ये एकाचा बंदुकीतून गोळी झाडून खून केल्याप्रकरणी फिर्यादी विकास उर्फ विक्की युवराज मलाडे (रा. प्रकाशनगर, लातूर) यांचा भाऊ राहुल मलाडे यास आरोपींनी स्वतःच्या घरी बोलावून घेऊन परवाना असलेल्या बंदुकीने गोळी मारून खून केला. पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक - ३ मध्ये झाली. न्यायालयाने अमोल उर्फ गणेश अण्णासाहेब गायकवाड यास जन्मठेप व १० हजार रुपये दंड, आर्म अ‍ॅक्ट कलमान्वये २ वर्षांची शिक्षा ठोठावली. तर अण्णासाहेब सदाशिवराव गायकवाड यांना निर्दोष मुक्त केले. या प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता व्ही. व्ही. देशपांडे यांनी सरकारची बाजू मांडली. जमादार हिंगडे यांनी कोर्ट पैरवी केली.

## 'यश - शांतीसाठी न्यू वे' उपक्रमाने जिंकली लातूरकरांनी मने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
'यश - शांतीसाठी न्यू वे ' या मनशक्ती विज्ञान केंद्र, लोणावळा व भारत विकास परिषद, मुख्य शाखा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या उपक्रमास लातूर शहर व तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, सर्व आशा सेविका, पालक यांची मने जिंकली. या उपक्रमास अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमाच्या दुसऱ्या दिवसाच्या सत्रात ' पालकत्वाची दिशा' मध्ये हुशारीला संस्काराचे कोंदण असणारे अपरिहार्य आहे' असे प्रतिपादन मनशक्तीचे मयूर चंदने यांनी केले. याला अनुसरून त्यांनी पालकां साठी 'मुलांना घडविताना' आजच्या व पुढील एआय जगातील आव्हाने पेलण्याचे धडे दिले. 'आरोग्यपूर्ण जीवनाचा मार्ग ' सत्रात बिघडलेल्या पेशींचे मन प्रार्थनेने सुधारून, विवेकपूर्ण आहार विहाराचा संकल्प करून शरीर आरोग्यदायी ठेवणे व तणावातून झालेल्या आजारावर ध्यान - प्रार्थनेने थोपवू शकतो याचे विज्ञाननिष्ठ विवेचन केले. गर्भसंस्कार या सत्रात जननपूर्व स्थिती, संकल्पपूर्व अपत्यप्राप्ती, गर्भधारणेपूर्वी व नंतर माता - पित्याच्या मनःस्थितीची आचारसंहिता याचे सखोल वैधानिक दृष्टिकोन साकारण्यात करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांच्या परदेश अभ्यास दौऱ्यासाठी ४ ऑगस्टला सोडत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
राज्यातील शेतकऱ्यांना प्रगत शेती तंत्रज्ञान, शेतमालाची निर्यात, कृषीमाल प्रक्रिया आणि बाजारपेठेतील मागणी यांची माहिती मिळावी, तसेच परदेशातील आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब त्यांच्या शेतीत व्हावा, यासाठी कृषी विभागामार्फत २०२५-२६ या वर्षासाठी परदेश अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत आहेत. याकरिता शेतकऱ्यांच्या निवडीसाठी लातूर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सोडत आयोजित करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना जर्मनी, नेदरलँड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इस्त्रायल, जपान, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स, चीन आणि दक्षिण कोरिया या देशांना भेटी देण्याची संधी मिळेल. या दौऱ्यांदरम्यान शेतकरी तेथील शेतकऱ्यांशी चर्चा, क्षेत्रीय भेटी आणि संबंधित संस्थांना भेटी देऊन शेती तंत्रज्ञान आणि अनुषंगिक बाबींची माहिती घेतील. लातूर जिल्ह्यासाठी पाच शेतकऱ्यांचे भौतिक लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये एक महिला शेतकरी, एक केंद्र किंवा राज्य शासनाचा कृषी पुरस्कार किंवा पिकस्पर्धा विजेता आणि तीन इतर शेतकरी यांचा समावेश आहे. यासाठी तालुक्यांमार्फत इच्छुक शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यापैकी पात्र प्रस्तावांची निवड करण्यासाठी ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात सोडत काढण्यात येईल. सर्व इच्छुक शेतकऱ्यांनी या सोडतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. व्ही. लाडके यांनी केले आहे.

# सरकारविरोधात 'छावा' आक्रमक

## अजितदादा शब्दाचे पक्के नाहीत : प्रदेशाध्यक्ष घाडगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यावरून छावा संघटना आक्रमक झाली असून, सरकारविरोधात राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी बुधवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे. पुणे येथे झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासंदर्भात मला शब्द दिला होता. मी शब्दाचा पक्का आहे, मंगळवारपर्यंत थांबा, असे त्यांनी वचन दिले होते. पण, अजितदादांनी कृषिमंत्री कोकाटे यांचा राजीनामा न घेता आपण स्वतः शब्दाचे पक्के नाहीत हे सिध्द



करून दाखवले आहे, असा आरोप यावेळी घाडगे केला आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेनंतर लातूर येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण व त्यांच्या कार्यकर्त्यांनी विजयकुमार घाडगे यांना बेदम मारहाण केली होती. त्यानंतर 'छावा'ने राज्यभर आंदोलन केले. एवढेच नव्हे तर जखमी असतानाही घाडगे हे अ‍ॅम्ब्युलन्समधून पुणे येथे गेले. तेथे त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या बैठकीत त्यांनी शेतकरीविरोधी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्या केल्या होत्या. त्यावेळी अजित पवार यांनी मंगळवार, २९ जुलैपर्यंत तुम्ही थांबा, मंगळवारी कोकाटे यांना बोलावून मी निर्णय घेणार आहे, मी तुम्हाला शब्द देतो, मी शब्दाचा पक्का आहे, अशी हमी दिली होती. मंगळवारपर्यंत अजित पवार यांनी कोकाटे यांचा राजीनामा घेतला नाही. त्यानंतर बुधवारी लातूर येथे विजयकुमार घाडगे यांनी पत्रकार परिषद घेऊन अजित पवार हे शब्दाचे पक्के नाहीत हे त्यांनीच सिध्द करून दाखविले आहे, असा आरोप घाडगे यांनी केला. आता आपण सोयाबीनचा भाव, पीकविमा, शेतकऱ्यांची कर्जमाफी या तीन प्रमुख मागण्या घेऊन महाराष्ट्रभर दौरे करणार आहोत. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे गाऱ्हाणे ऐकून घेणार आहे. यानंतर याबाबत चर्चा करून सरकारविरोधात तीव्र आंदोलन उभारणार असून शनिवार, २ ऑगस्टपासून या दौऱ्याला नांदेड जिल्ह्यातून सुरूवात करणार असल्याचे यावेळी घाडगे यांनी सांगितले. दरम्यान, राजीव गांधी चौकात 'छावा'च्या कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्या निषेधाचे फलक घेऊन त्यावर पत्ते उधळून अजित पवार व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात आंदोलन केले. यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## आज पत्रकारांसाठी शहरात कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अंतर्गत लातूर विभागीय माहिती कार्यालय आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्ह्यातील पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर शहरातील डॉ. भालचंद्र सभागृहात सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, विभागीय माहिती उपसंचालक विवेक खडसे यांची उपस्थिती राहील. या कार्यशाळेत 'कृत्रिम बुध्दिमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावर जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे मार्गदर्शन करतील, तर 'वृत्त संकलन आणि संपादनात शुध्दलेखनाचे महत्त्व' या विषयावर प्रा. दीपक रंगारी मार्गदर्शन करतील.

## जयतीर्थ मेवुंडी यांचे लातुरात शास्त्रीय गायन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या स्मृतिप्रित्यर्थ लातूरमध्ये स्वरविलास संगीत दरबार या अभिजात शास्त्रीय संगीत सभेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यंदा या स्वरविलास संगीत दरबारात किराणा घराण्याचे गायक जयतीर्थ मेवुंडी यांचे गायन लातूरकर श्रोत्यांना अनुभवायला मिळणार आहे.



लातूरमधील सांस्कृतिक चळवळ कार्यरत ठेवण्यासाठी स्वरविलास संगीत दरबार आयोजित केला जातो. विलासराव देशमुख हे शास्त्रीय संगीताचे चाहते होते. त्यामुळे यांच्या स्मृतिनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या संकल्पनेतून व शास्त्रीय संगीताच्या प्रचारासाठी कार्यरत असलेल्या आवर्तन प्रतिष्ठानतर्फे होणारी ही संगीत सभा १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजता दयानंद सभागृह येथे होणार आहे. मागील वर्षी मेवाती घराण्याचे प्रसिध्द गायक पं. संजीव अभ्यंकर यांचे गायन या संगीत दरबारात झाले होते. यंदा जयतीर्थ मेवुंडी यांचे गायन होणार असून, त्यांना पुण्याचे युवा तबलावादक महेशराज साळुंके, कोल्हापूरचे संवादिनी वादक स्वरूप दिवाण हे साथ करणार आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य असून उपस्थित रहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय शहा, सचिव डॉ. रविराज पोरे, विशाल जाधव, मार्गदर्शक अतुल देऊळगावकर, डॉ. अजित जगताप, डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. शशिकांत देशमुख, प्रा. हरिसर्वोत्तम जोशी यांनी केले आहे.

## महिला तंत्रनिकेतन येथे महिला सुरक्षा रक्षक भरती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
येथील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे महिला सुरक्षा रक्षकाची भरती करण्यात येणार आहे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत ही भरती होणार आहे.

इच्छुक माजी सैनिक, पत्नी, माजी सैनिक विधवा व माजी सैनिक पाल्यांनी आपला मुळ अर्ज व मूळ कागदपत्रांसह ५ ऑगस्ट, २०२५ रोजी मुलाखतीसाठी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे उपस्थित रहावे, निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला तात्काळ नियुक्ती देण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांची एक वर्षाची संपूर्ण कर्जमाफी तात्काळ केली जाईल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
शेतकऱ्यांची एक वर्षाची संपूर्ण कर्जमाफी तात्काळ केली जाईल, तसेच पुढील दहा वर्षांत शेतकऱ्यांना सक्षम करणारे आर्थिक धोरण राबवले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

'वज्रमूठ - सर्व सामाजिक संघटना' यांच्यावतीने बुधवारी मुंबईत सह्याद्री अतिथी गृहात अ.भा. छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन राज्यातील विविध प्रश्नावर चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी हे आश्वासन दिले. तसेच अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या नावाने नवीन महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. राज्यातील वाढत्या अन्याय, अत्याचार, सामाजिक असंतोष, शेतकरी आणि घटनात्मक मूल्यमापनाच्या पार्श्वभूमीवर वज्रमूठ सर्व महाराष्ट्रातील सामाजिक संघटना या व्यासपीठाच्यावतीने ही सविस्तर चर्चा झाली. या बैठकीवेळी जलसंपदा मंत्री गिरीष महाजन उपस्थित होते. यावेळी राज्यभरातून आलेल्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांकडे आपल्या मागण्यांचा प्रस्ताव ठेवला.

ज्या प्रकरणांमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे, त्यातील दोषींवर कडक कारवाई केली जाईल. तसे संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांची एक वर्षाची संपूर्ण कर्जमाफी तात्काळ केली जाईल. तसेच पुढील दहा वर्षांत शेतकऱ्यांना सक्षम करणारे आर्थिक धोरण सरकार राबवील. क्रांतीसूर्य स्व.अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या नावाने नवीन महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

रमी खेळणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर योग्य ती कारवाई होईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी शिष्टमंडळाला दिली. ही बैठक संघर्ष नव्हे, तर संवादासाठी होती आणि त्यातून जनतेच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्यासाठी सरकार सकारात्मक आहे, असा विश्वास फडवणीस यांनी दिला.

### शिष्टमंडळात यांचा होता समावेश

यावेळी या शिष्टमंडळात अखिल भारतीय छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील, स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष माधवराव देवसरकर, मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजेश मोरे, अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे, राधेश्याम पवळ, दशरथ कपाटे, अविनाश कदम, सुनील कदम, सुभाष कोल्हे, दिलीप गवळी, मनीष तिवडे, योगेश पाटील, राजेश चव्हाण, विशाल देवणे, उत्तम बिराजदार, मनोज पाटील, मच्छिंद्र चिंचोले, साई पाटील, शंकर जाधव आदींसह शिष्टमंडळात महाराष्ट्रातील पदाधिकारी, इतर मान्यवर उपस्थित होते.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाची स्नेहल मुलींमध्ये राज्यात प्रथम



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाची इयत्ता १२वीची स्नेहल शिवराज मुळे हिने सीईटी-२०२५ मध्ये एनटीसी गटात मुलींमध्ये राज्यात सर्वप्रथम क्रमांक पटकवला आहे. त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते स्नेहलचा पालकांसह सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी, शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, प्र. प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर, डॉ. संध्या वाडीकर, डॉ. युवराज सारणीकर, सीईटी समन्वयक प्रा. कविता जाधव, डॉ. कोमल गोमारे, प्रा. विजयकुमार मांदळे, प्रा. व्यंकट कैलै यांची प्रमुख उपस्थिती होती.

सीईटी-२०२५ परीक्षेत 'दयानंद विज्ञान'चे जवळपास ५०० विद्यार्थी इंजिनिअरिंग प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. ९८ टक्के पर्सेंटाईल गुण घेणारे २८ तर ९९ टक्के पर्सेंटाईल घेणारे ८ विद्यार्थी आहेत. दयानंद विज्ञान महाविद्यालयाने गुणवत्तेचा 'लातूर पॅटर्न' निर्माण करून आपला दबदबा कायम ठेवला आहे. कोणतीही खाजगी शिकवणी न लावता केवळ शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मी यश संपादन केले.

संस्थेने मला फीसमध्ये सवलत दिली. त्याबद्दल स्नेहलने संस्थेचे आभार मानले.

## अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त अन्नसेवा मंडपाचे भूमिपूजन

लातूर जिल्हा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त लोकनायक सामाजिक संघटनेच्यावतीने शुक्रवार, १ ऑगस्ट रोजी अण्णा भाऊ साठे चौक येथे अन्नसेवा देण्यात येणार आहे. 'एक घास आपुलकीचा, लोकनायक संघटनेचा' या शिर्षकाखाली भव्य मंडपामध्ये अन्नसेवा दिली जाणार असून, या अन्नसेवा मंडपाचे शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत व भाजप नेते संतोष बेंबडे यांच्या हस्ते बुधवारी भूमिपूजन करण्यात आले.

साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी लोकनायक सामाजिक संघटनेच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच भाग म्हणून यावर्षी डीजे, डॉल्बी, स्वागत पीठ, विद्युत रोषणाई यासाठी लागणारा खर्च टाळून साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना अन्नसेवा व पाणीसेवा दिली जाणार आहे, अशी माहिती संघटनेचे सल्लागार अ‍ॅड. बालाजी कुटवाडे यांनी दिली आहे.

यावेळी गांधी चौक ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवटे, स्वामी विवेकानंद चौक ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, लोकनायक संघटनेचे अध्यक्ष महादू रसाळ, सचिव बंटी गायकवाड, अशोक देडे, नेताजी जाधव, कैलास कांबळे, सुनील बसपुरे, आनंद वैरागे, श्याम चव्हाण, प्रीती माउली लातूरकर, किसन कदम, सर्फराज सय्यद, अनिल जाधव आदी पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.

## अधिकारी, कर्मचारी यांनी कर्तव्यात कसूर करू नये : आ. रमेश कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जुलै -**
प्रशासन गतिमान झाले तर निश्चितपणे विकास कामांना गती मिळते. शेवटच्या माणसापर्यंत विकासाच्या योजना पोहोचल्या पाहिजे. तळागाळातील माणसाला न्याय मिळाला पाहिजे. केवळ याच उद्देशाने जनता दरबारचे नियोजन असून विविध विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर न करता आपआपली जबाबदारी क्षमतेने पार पडावी असे प्रतिपादन आमदार रमेशआप्पा कराड यांनी ममदापूर येथील जनता दरबारात बोलताना केले.

यावेळी विविध गावच्या नागरिकांनी आपले प्रश्न अडीअडचणी आणि व्यथा जनता दरबारात मांडल्या. यातील काही प्रश्न आठवडाभरात मार्गी लागतील तर उर्वरित सर्व प्रश्न महिनाभरात निकाली निघतील असेही त्यांनी बोलून दाखवले.

सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्या त्यांच्याशी संवाद करता यावा यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर पाटी येथील श्री हनुमान मंदिर सभागृह येथे बुधवारी पूर्व लातूर तालुका कार्यक्षेत्राचा आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबार मध्ये विविध गावच्या नागरिकांनी प्रलंबित असलेले विविध प्रश्न आणि समस्या मांडल्या. या सर्व प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन जे शक्य आहेत ते प्रश्न जागेवरच आ. कराड यांनी संबंधितांना सूचना करून सोडविल्या. सकाळी सव्वा अकरा वाजता सुरू झालेला जनता दरबार साडेचार वाजेपर्यंत चालला. या जनता दरबारास ग्रामीण भागातील



जनतेने मोठा प्रतिसाद दिला.

यावेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत, तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, भूमि अभिलेखचे उपअधीक्षक अशोक चव्हाण यांच्यासह भाजपाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, विजय मलवाडे, पांडुरंग बालवाड, गोविंद नरहारे आदींची प्रमुख उपस्थित होती. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जनता दरबारात ग्रामीण भागातील विविध गावातील नागरिकांनी शेतरस्ते, शिव रस्ते, शिव रस्त्यावरील अवैध उत्खनन, निकृष्ट रस्त्याची कामे आदी समस्या आ. कराड यांनी जाणून घेतल्या.

## लाडसावंगी जिल्हा परिषद शाळेत तब्बल ७९४ विद्यार्थ्यांचा निबंध स्पर्धेत सहभाग



छत्रपती संभाजीनगर - तालुक्यातील लाडसावंगी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये स्वातंत्र्य दिन आणि स्मार्ट गोदावरी वर्धापन दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला असून ७९४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी मोबाईलचे फायदे व तोटे, लोकशाही पुढील आव्हाने, इंग्रजी व मराठी भाषा, पर्यावरणामुळे होणारे परिणाम, सध्याची परिस्थिती आणि माझी आवडती शाळा असे ज्वलंत विषय देण्यात आले होते. पुढील काळात अशाच प्रकारच्या सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल असल्याचे संपादक थोर यांनी सांगितले.या वेळी शाळेचे शिक्षक धस सर, व्यवस्थापक मोनिका थोर, पूजा सोमासे, पल्स मीडियाचे राहुल दहातोंडे, संदीप शिंदे, दै.आनंद नगरीचे आनंद अंभोरे, गणेश पुजारी, कृष्णा पवार, जीवन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन संदीप शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन पूजा सोमासे यांनी केले.

## सोयगाव आगारातील वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर वाडेकर यांचा कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेच्या वतीने सत्कार

सोयगाव,दि.३१ जुलै - सोयगाव एसटी बस आगारातील वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर नारायण वाडेकर हे २७ वर्षे २ महिने २७ दिवस वर्षाच्या सेवेनंतर एसटी महामंडळाच्या सेवेतून निवृत्त झाले. यानिमित्त गुरुवार रोजी त्यांचा सोयगाव बस



आगाराच्या वतीने त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेच्या वतीने त्यांचा शाल,फुल गुच्छ व भेट घेऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सोबत यावेळी कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन योगेश बोखारे,पतसंस्थेचे कॅशियर कृष्णा शेवाळकर सह आदी उपस्थित होते.

# कोकणातील नद्यांचे पाणी गोदावरीत आणणार : राधाकृष्ण विखे पाटील



छाया. बाळू आहेर पैठण



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३१ :- कोकण भागात समुद्रात वाहून जाणारे नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात आणणार असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले विखे यांच्या शुभहस्ते नाथसागर जलाशयातील पाण्याचे विविधत पूजन करून गोदावरी पात्रात ९४३२ क्युसेक विसर्ग करण्यात आले. याप्रसंगी पैठणचे आमदार विलास बाप्पू भुमरे, आमदार रमेश बोरणारे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार हिकमतराव उढाण,आमदार विठ्ठल लंगे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी लाभक्षेत्र विकास मुख्य व प्रशासक अभियंता श्रीमती सुनंदा जगताप,जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता अरुण नाईक,जलसिंचन मुख्य अभियंता राजीव मुंदडा,गोदावरी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी महासंचालक संतोष सबनीसवार, एसडीएम नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार,न.प मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, पं. स बीडीओ मनोरमा गायकवाड, तुषार शिसोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना नामदार विखे म्हणाले की नाथसागर जलाशय निर्मितीसाठी स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांचे मोलाचे कार्य असून राज्यातील पाहिले हायड्रो प्रकल्प हे याठिकाणीच निर्माण झाले. धरणाच्या पायाभरणी पासून ते आतापर्यंत आपण या गोष्टीचे साक्षीदार आहोत, गाळ उपसा,धरणाचा पायथ्याशी असलेल्या संत ज्ञानेश्वर उद्यानाचे सुशोभीकरण,जलाशयावरील सोलार प्लांट ,शेतकऱ्यांसाठी महत्वकांक्षी असलेली ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजनेसाठी ३०० कोटींचा निधी बाबत यावेळी त्यांनी घोषणा केली. त्यापाठोपाठ पैठणशी असलेली आपुलकी,संत ज्ञानेश्वर उद्यान पाहण्यासाठी सायकल प्रवास आदी आठवणी यावेळी विखे यांनी बोलतांना व्यक्त केल्या. कोकण भागातील ६५ ते १०० टीएमसो पाणी गोदावरीत आणणे हे आपले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ड्रीम प्रोजेक्ट आहे. यासाठी आम्ही त्या विभागाचे कल्याण येथील ऑफिस नाशिक येथे आणले असल्याचे ही यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्णन विखे पाटील म्हणाले.पैठण कृषी उत्पन्न बाजार समिती, संतपीठ आणि माऊलींचे जन्मगाव आपेगांव येथे मंत्री मोहोदयांचा सत्कार करण्यात आला.

नाथसागर जलाशयाचे पूजन करून धरणाच्या २७ पैकी १८ गेट अर्ध्या फुटाणे वर करून गोदावरी पात्रात क्युसेक प्रमाणे विसर्ग करण्यात आला. सध्या धरणाच्या पाणीसाठ्याची टक्केवारी ९१.४७ इतकी असून १५५८७ क्युसेक प्रमाणे पाण्याची आवक होत आहे. नाथसागर जलाशयाच्या २७ पैकी १८ गेट मधून करण्यात आलेला विसर्ग पाहण्यासाठी पर्यटकांनी एकच गर्दी केली होती. जायकवाडीच्या कार्यकारी उप अभियंता श्रध्दा निंबाळकर, अशोक चव्हाण, पो.नि. महादेव गोमारे, शाखा अभियंता मंगेश शेलार, कटकधोंड, एम.एल. शेखदार, रितेश भोजने गणेश खराडकर, आबासाहेब गरुड, अप्पासाहेब तुजारे, निळकंठ पवार, ज्ञानेश्वर कावरखे, यु.बी.वाघ, मुकुंद जोशी, अब्दुल बारी गाजी, संजय चव्हाण, पी.बी. मगरे , बाळू गारुळे, उमेश मिसाळ आदी यावेळी उपस्थित होते.

## एमजीएम विद्यापीठास कर्नल अरविंद पाठक यांची भेट



छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ : भारतीय सैन्य दलात कर्तव्य बजावत असलेले एमजीएम विद्यापीठाचे माजी विद्यार्थी कर्नल अरविंद पाठक यांनी आपल्या पत्नी विदुषी पाठक आणि सुपुत्र योहान यांच्यासह एमजीएम विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. २०११ मध्ये बी.टेक (आयटी) पदवी प्राप्त केलेल्या कर्नल पाठक यांनी लेह-लडाख,जम्मू-काश्मीर, ईशान्य भारत, पुणे व सीमाभागात जबाबदारीने आपली सेवा बजावली आहे. या भेटीदरम्यान त्यांनीकुलपती अंकुशराव कदम यांची भेट घेत विविध विषयांवर सविस्तरपणे चर्चा केली. यावेळी, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, प्राचार्या डॉ. विजयामुसांडे, आयआयसीटी संचालिका डॉ.शर्वरी तामणे, मानव संसाधन विभागाच्या संचालिका डॉ. टीना सहारन, प्रा.व्ही.के.आहिरे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. एमजीएमने दिलेल्या शिक्षणामुळे आमचा शैक्षणिक पायामजबूत झाला. या आम्हाला मिळालेल्या शिक्षणामुळे आम्ही आमचे करियर यशस्वीपणे घडवू शकलो, असे प्रतिपादन कर्नल अरविंद पाठक यांनी यावेळी केले.


## धारेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात साजरा

बिडकीन दि ३१ जुलै- धारेश्वर शिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर संचलित प्राथमिक व माध्यमिक विद्यालय ०८ नाथ प्रांगण गारखेडा परिसर येथे धारेश्वर शिक्षण संस्थेच्या संचालिका तथा माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रश्मीताई बोरसे यांच्या उपस्थितीत दि २७ जुलै रोजी सन २००८ च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शाळेमध्ये घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रश्मीताई बोरसे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनगटे या होत्या. प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल आपले विचार मांडले व आपण कोणता व्यवसाय किंवा नोकरी करत आहोत याबद्दल माहिती सांगितली. व प्रत्येक शिक्षकांनी त्यांना भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी मोलाचे कष्ट घेतले.या कार्यक्रमास शाळेतील पी एम पोटे, रामदास मनगटे , पोपटराव सपकाळ , अंकुश अंजनवतीकर , विनोद गवळी , संजय सोन्ने रामेश्वर मनगटे , नारायण ताटू माया पेरे, सरला पाटील, सदवर्ते, पुष्पा सराईकर काकडे , ज्योती पाटील, राम तुळसे आदींची उपस्थित होते

# डॉ. प्रणिता मात्रे यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून निलंबित करा : विजय चव्हाण

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३१ जुलै पैठण तालुक्यातील सर्वात मोठे बाजारपेठ तसेच डी एम आय सी व ५८ खेडे जोडून असल्याने हजारो रुग्ण उपचारासाठी येत असून बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ प्रणिता मात्रे मनमानी तसेच शासनाची फसवणूक करत असल्याने यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा मा. जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांनी लेखी निवेदन द्वारे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे मागणी केली आहे.



सविस्तर माहिती अशी की बिडकीन ग्रामीण रुग्णालयमध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रणिता मात्रे उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णावर व्यवस्थित उपचार करीत नसून ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या महिलाना घाबरून देतात व नंतर नातेवाईकाच्याच रुग्णवाहिके मधून स्वतःच्या चालवीत असलेल्या न्यू मी एन मम्मी या खासगी दवाखान्यात रात्री बेरात्री घेऊन जाऊन गरज नसताना सिझर करून अवाच्या सव्वा बिल वसूल करतात गोरगरीब रुग्णांची लुबाडणूक करण्याचे मागील एका वर्षापासून सुरू केले आहे.हजेरी रजिस्टरवर मागील दोन महिन्यापासून सही नसल्याचेही आढळून आले. खाजगी दवाखाना डॉ. मात्रे यांच्या नणंद डॉ.ज्योती देवगुडे यांच्या नावावर असून अनेक नातेवाईकाचा वापर डॉ.मात्रे या पैसे कमविण्यासाठी करताना दिसून येत आहे.

रुग्णांना अपनास्पद वागणूक देऊन अरेरावी, शिव्या देणे .डॉ. मात्रे नेहमी करतात. तसेच डॉ. मात्रे यांचा पती देखील डॉक्टर असून तो तिच्या जागी बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात बाह्य रुग्ण विभाग चालवतात अशा मनमानी कारभारामुळे डॉ. मात्रे नेहमी चर्चेत असून ग्रामीण रुग्णालयातील अनेक डॉक्टर व कर्मचारी यांना देखील मानसिक त्रास डॉ. मात्रे मुळे होत असून त्यांनी देखील खाजगी मधे बोलून दाखविले. बिडकीन ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रणिता मात्रे यांचे त्वरित निलंबन करून गुन्हा दाखल करण्याची लेखी तक्रार भाजप बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा माजी जि प सदस्य विजय चव्हाण यांनी केली आहे.

## रविंद्र गायकवाड यांची बिनविरोध निवड



बिडकीन. दि ३१ जुलै पैठण तालुक्यातील बिडकीन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सादातनगर येथे शालेय व्यवस्थापन समिती ची गठन व निवड प्रक्रिया निमित्ताने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक गौतम घेवंदे व सहशिक्षिका जे के नागरगोजे यांच्या वतीने शालेय व्यवस्थापन समिती चे पदाधिकारी निवड करण्यात आली.याप्रसंगी अध्यक्ष पदी रविंद्र साहेबराव गायकवाड, उपाध्यक्ष पदी मोनिका साळवे, सदस्य पदी अफसर अजिज शेख,जाबेर शेख,मिना, राजेश एरंडे,महेमुद पाशू शेख, लक्ष्मी सुभाष गोसावी,मंगल भागिनाथ गोरे आदींची उपस्थिती होती.

## अवघड क्षेत्रातील सेवा जेष्ठता यादीत गोंधळ; शासन निर्णयाचे उल्लंघन, बदल्यांची प्रक्रिया थांबवावी - शिक्षक समितीची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.३० जुलै - जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू असताना संवर्ग ३ (अवघड क्षेत्र) मधील सेवा जेष्ठता यादीत मोठा गोंधळ झाल्याचा आरोप शिक्षकांनी केला आहे. शासन निर्णयाचे उल्लंघन करत तयार करण्यात आलेली ही यादी अन्यायकारक असून, ही यादी सुधारली जाईपर्यंत संवर्ग ३ मधील बदल्यांची प्रक्रिया थांबवावी, अशी ठाम मागणी शिक्षक समितीने केली आहे.

दि. २८ जुलैपासून बदली पोर्टलवर अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, त्याअंतर्गत अवघड क्षेत्रात कार्यरत शिक्षकांच्या बदल्यांचे नियोजन करण्यात येत आहे. मात्र, पोर्टलवर प्रकाशित झालेल्या सेवा जेष्ठता यादीत अनेक विसंगती आढळून आल्या आहेत. शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, यादी तयार करताना शासन निर्णयानुसार अवघड क्षेत्रातील प्रत्यक्ष सेवा पूर्ण केल्याचा दिनांक विचारात घेतलेला नाही. यामुळे काही शिक्षकांची सेवा कमी असूनही त्यांची नावे यादीत वर असून, जास्त सेवा असलेल्या शिक्षकांना खाली स्थान देण्यात आले आहे. ही बाब सरळसरळ अन्यायकारक असून, बदली प्रक्रियेत पारदर्शकता असावी, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. २९ जुलै रोजी शिक्षक समितीने शिक्षणाधिकारी यांना यासंदर्भात निवेदन दिले आहे. यामध्ये बदल्यांची प्रक्रिया थांबवून सेवा जेष्ठता यादीत सुधारणा करूनच पुढील प्रक्रिया राबवावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष विजय साळकर, जिल्हा सरचिटणीस रंजित राठोड, नितीन नवले, शामभाऊ राजपूत, कडुबा साळवे, विष्णू भंडारे, गजानन वरकड, के. डी. मगर, बबन चव्हाण, सतीश कोळी यांच्यासह अनेक शिक्षकांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

शिक्षकांच्या या मागणीची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि बदल्यांमधील संभाव्य अन्याय टाळावा, अशी अपेक्षा सर्व शिक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय - अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर - ४१४१११

**आर्कीटेक्ट व ठेकेदार यांची ३ वर्षे मुदतीसाठी सुचीबध्द करण्यासाठी निवीदा**

युनियन बँक ऑफ इंडीया, क्षेत्रिय कार्यालय, अहिल्यानगर तीन वर्षे मुदतीसाठी नेमणुक करण्यासाठी आर्किटेक्ट / सल्लागार संस्था, सिव्हील व इलेक्टीकल कॉन्टॅक्टर यांचेकडून बंद लिफाफ्यात निवीदा मागवित आहेत. फर्नीशिंग, इंटेरियर डेकोरेशन, लॅण्डस्केपींग कामाचे स्वरूप (४० लाखांपर्यत) व इलेक्टीकल, ए.सी.व डाटा केबलिंग कामाचे स्वरूप (२० लाखांपर्यत) आणि आर्कीटेक्ट डिझाईनिंग काम हे अहिल्यानगर क्षेत्रिय कार्यालय कक्षेतील सर्व शाखा व इतर मालमत्ता करीता आहे.

इच्छुक वैयक्तिक/ फर्मस/ कंपनी हे अर्ज फॉर्म हे वरील पत्त्यावरुन रु १,000/- (विना परतावा) ची अहिल्यानगर येथे देय असलेली व युनियन बँक ऑफ इंडीयाच्या नावे पे ऑर्डर / डिमांड डाफ्टद्वारे भरणा केल्यावर कार्यालयीन वेळेत दि. ०१/०८/ २०२५ ते दि.:२१/०८/२०२५ दरम्यान मिळवता येतील. सदर अर्ज फॉर्म हे बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in व www.eprocure.gov.in. व येथूनही डाऊनलोड करता येतील. पूर्ण भरलेले अर्ज फॉर्म व सिलबंद निविदा वरील पत्त्यावर सादर करण्याची अंतिम तारिख दि. २१/०८/२०२५ दु. ४.00 वाजेपर्यत आहे.

प्राप्त अथवा कोणताही निविदा अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार युनियन बँक ऑफ इंडीयाने राखून ठेवला आहे.

दि. ०१/०८/२०२५
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

ARL

# पावसाळ्यात होणारे आजार व आयुर्वेदिक उपचार


पावसाळा एक असा ऋतू आहे, ज्याची सर्वच आतुरतेने वाट बघत असतात. ३-४ महिने सतत होणाऱ्या भयंकर उकाड्यामुळे प्रत्येक जीव, प्राणीमात्र पावसाळा लवकर यावा अशी आस लावून असतात. पावसाळा येताच सर्वच प्राणी, जीवजंतू, वृक्षवल्ली यांच्यात नवजीवन, चैतन्याचा संचार होतो. सर्वत्र दाट हिरवळ पसरलेली असते. श्रावणातील ढगाळ वातावरण आणि निसर्गसौंदर्य मनाला आनंदित करते आणि माणूस प्रफुल्लित होतो. निसर्गाने राहा ऋतू प्रदान केले आहेत. प्रत्येक ऋतूचे नहत्त्व आगळेवेगळे आहे. प्रत्येक दोन ऋतूंमध्ये राधिकाळ असतो, ज्याचे आयुर्वेदामध्ये आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व दिले गेले आहे.

१) ग्रीष्म २) वर्षा, ३) शरद ४) हेमंत ५) शिशिर, ६) वसंत या सहा ऋतूत आहार विहार कशा प्रकारे असावा, दिनचर्या, रात्रीचर्या, ऋतुचर्या यांचे नियम पालन निरोगी राहण्यासाठी कसे करावे, यांचे विस्तृत विवेचन केले आहे. या सर्व ऋतूमध्ये पावसाळा जितका आनंददायी, मनोहरी तितकाच कधीकधी कष्टदायी सुध्दा होतो. पावसात भिजल्यावर सर्दी, पडसे, खोकला, ताप, अतिसार, मलेरिया इत्यादी रोग त्वरित उद्भवतात. या ऋतूत हवा ओलसर, दमट असल्यामुळे डास, माशा यांचा प्रसार अधिक होतो. पाणी दूषित होऊन कळ, भाजीपाला यांगला मिळत नाही आणि त्यामुळे अनेक रोग उत्पन्न होतात. त्यात काही सामान्य रोग व त्यावरील आयुर्वेदिक उपचार खालील प्रमाणे वर्णित केले आहेत. वर्षा ऋतूत सर्वप्रथम रोगांपासून बचाव करण्याचा उपाय केला पाहिजे - १) पावसात शक्यतो न भिजणे, भिजल्यास घरी येवून पुन्हा स्वच्छ पाण्याने स्नान करून शरीर पुसून कोरडे करावे. २) घरात स्वच्छता ठेवावी, जड पदार्थ खाणे टाळावे. दिवसा झोपू नये. घराबाहेर साचलेल्या पाण्यावर, डबक्यावर कीटकनाशक औषध शिंपडावे. या सर्व उपायांनी रोगापासून बचाव होऊ शकतो. तरीही जर मिथ्या आहरविहाराने रोग निर्माण झाल्यास खालील उपचार करावे. समान्यतः पावसाळ्यात सर्दी, पडसे, खोकला यांचा प्रकोप होतो. सर्दी झाली की काही दिवस खोकला असतोच. वारंवार शिंका येणे, खाण्यात अरूची वाटणे, शरीरात (अंग) दुखणे इ. अशा अवस्थेत बैद्यनाथ लक्ष्मीविलास नारदीय १-१ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ मध व अदरक रसासोबत बारीक वाटून घ्यावी. वैद्यनाथ कासामृत २-२ चमचे दिवसातून ३ वेळा घ्यावे. खोकल्याचा जोर जारत असल्यास सितोपलादी चूर्ण अर्धा चमचा मधात मिसळून घ्यावे.

## बैल उधळून गळफास, शेतकऱ्याचा मृत्यू, पळाशी शिवारातील घटना

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ जुलै चरत असताना बैल भडकून हातातील कासरा गळ्यात गुतल्याने शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.२८) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली याप्रकरणी बुधवारी (दि.३०) दुपारी दोन वाजता घटनेचा महसूल विभागाने पंचनामा केला. लखन नामदेव शिंदे(वय २४) असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे सोयगाव तालुक्यातील पळाशी शिवारात गट क्र-३०५ मध्ये तो स्वतःची दोन्ही बैल शेताच्या बांधावर चारत



असताना एक बैल अचानक उधळून त्याच्या हातातील बैलाचा कासरा अचानक गळ्या शी येवून त्याला घट्ट फाशी बसली यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला दरम्यान त्यास तातडीने बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले.मंगळवारी दुपारी बारा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पश्चात आई,वडील,दोन भाऊ असा परिवार आहे.याप्रकरणी सोयगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३८/२०२५

१/- शबनबी नबीखा पठाण, वय ५० वर्ष, धंदा घरकाम, रा. फर्दापूर, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- फरझाना बेगम हुसैन खान, वय २८ वर्षी, धंदा, घरकाम, रा. अजिंठा, तां. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.३/- रिझवाना साजिद खान पठाण, वय २७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. फर्दापूर, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. ४/- रुकसाना नबीखा पठाण, वय २२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. वरीलप्रमाणे ५/- नदीम नबीखा पठाण, वय १३ वर्षे, अ. पा. क. म्हणून अर्जदार क्र. १

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नबीखा नामदार खा पठाण यांचा दि. १५/१२/२०21 मौजे फर्दापूर, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र.१ ते ५ है वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत नबीखा नामदार खा पठाण यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ३१/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २१/१ /२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४५२/२०२५ पुढील तारीख ०८/०८/२०२५

अर्जदार : १) गोरखनाथ पाटीलबा बोराडे, २) कैलास गोरखनाथ बोराडे, ३) संपत गोरखनाथ बोराडे, वरील सर्व रा. वडगाव रामपुरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) कल्पना उध्दव अवसरमल, विवाहपुर्वीचे नाव कल्पना गोरखनाथ बोराडे रा.एकलहेरा, ता.गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत लक्ष्मीबाई गोरखनाथ बोराडे यांचा दि. १४/०५/२०२५ रोजी मौजे वडगांव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला आहे. मयत लक्ष्मीबाई गोरखनाथ बोराडे आणि अर्जदार नं. १ पती पत्नी होते त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ४ यांचा जन्म झाला आहे. मयत लक्ष्मीबाई गोरखनाथ बोराडे यांचे अर्जदार नं. १ पती, अर्जदार नं. २ व ३ मुले आणि अर्जदार नं. ४ विवाहित मुलगी आहे. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ३०/०७/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

Civil Misc. Application No. 304/2025

अर्जदार : १. झुंबरबाई भ्र.कचरू गायकवाड. २. अनिल पिता कचरू गायकवाड, दोघे रा. सुलतानाबाद, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३. कविता भ्र. रूस्तुम तेझाड, रा. बाभुळगाव बु., ता.वैजापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचा मुलगा व अर्जदार नं. २ व ३ यांचा भाऊ नामे राजु कचरु गायकवाड यांचा दि.२६/०८/२०२० रोजी मौजे सुलतानाबाद, ता.गंगापुर येथे मृत्यु झाला आहे. मयत राजु कचरु गायकवाड हे मृत्युवेळी अविवाहित होते मयत राजु कचरु गायकवाड यांना अर्जदार नं. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत राजु कचरु गायकवाड यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ३०/०७/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय व. स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४९७/२०२५ — पुढील तारीख ०३/०९/२०२५

अर्जदार : १) यशोधरा राजेश नितनवरे, २) यश राजेश नितनवरे, ३) साक्षी राजेश नितनवरे, सर्व रा.आरापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ह.मु. सत्यम अपार्टमेंट, विनायक नगर, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे शहर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.ए.एस.बर्वे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत राजेश हरिश्चंद्र नितनवरे यांचा दि.२९/१२/२०२३ रोजी वोक्हार्ट रुग्णालय, अंबाजरी रोड उत्तर, शंकर नगर, नागपुर शहर, नागपुर येथे वैद्यकीय उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे. मयत राजेश हरिश्चंद्र नितनवरे आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ व ३ यांचा जन्म झाला असुन मयतास अर्जदार नं. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना मौजे आरापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील शेत जमीन गट नं. ५१, एकुण क्षेत्र ७ हे. ७४ आर. मधील मयत राजेश हरिश्चंद्र नितनवरे आणि विजय सखाहरी गवई यांचे नावे असलेली ४० आर. क्षेत्रफळाची सामाईक जमीनीचे अनुषंगाने महसुल अभिलेखास नामांतरासाठी व तसेच शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व

शिक्क्यानी आज दिनांक ३०/०७/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर, गंगापुर सहायक

## अग्रलेख...

# जराही लाज नाही..!

महाराष्ट्र सरकारने जून २०२४ मध्ये सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत गैरप्रकार झाल्याबद्दल बोंबा मारल्या जात आहेत. पण या गैरप्रकारांचे वैशिष्ट्य असे की ते या योजनेची अंमलबजावणी करणारे कर्मचारी, प्रशासन किंवा सरकार यापैकी कोणीही केलेले नाहीत. काही ठिकाणी संगनमत निश्चित असू शकते. पण जो काही गैरप्रकार आहे जवळपास तो साराच जनतेने, या राज्यातील लोकांनी केलेला आहे, अगदी निलाजरेपणाने..! सामाजिक भान, जाणीव, कर्तव्य, नैतिकता वगैरे सारेकाही धाब्यावर ठेवून केलेला आहे.

'लाडकी बहीण' ही महिलांचे किंचित आर्थिक सक्षमीकरण आणि विकासासाठी एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा उद्देश २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपयांचे आर्थिक साहाय्य प्रदान करणे हा आहे. ज्यामुळे त्यांचे आरोग्य, पोषण आणि कुटुंबातील निर्णायक भूमिका मजबूत होईल. त्यात लाभार्थी महाराष्ट्राची कायमस्वरूपी रहिवासी असावी. तिचे वय २१ ते ६५ वर्षे असावे. तिच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा कमी असावे, आधार संलग्न बँक खाते असावे, विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, निराधार महिलांना प्राधान्य आणि प्रत्येक कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ, अशा यातील प्राथमिक तरतुदी आहेत. या योजनेसाठी राज्य सरकारने ४६,००० कोटींचा निधी मंजूर केला आहे, आणि आतापर्यंत २.५० कोटींहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. मात्र, या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसोबतच अनेक गैरप्रकार आणि अनियमितता उजेडात येत आहेत. या 'लाडक्या बहिणी'ने लाखो महिलांना लाभ दिला असला, तरी त्यातील गैरप्रकारांनी प्रशासकीय कमकुवतपणा उघड केला आहे. योजनेतील सर्वांत मोठा गैरप्रकार म्हणजे अपात्र व्यक्तींनी घेतलेला लाभ हा आहे. यातील नुकतीच उघडकीस आलेली सर्वांत गंभीर आणि लाजिरवाणी बाब म्हणजे चक्क १४,२१८ 'पुरुषांनी' स्वत:ला स्त्री दाखवून आतापर्यंत २१.४४ कोटी लाटले आहेत. यात काही प्रकरणांमध्ये पुरुषांनी महिलांच्या नावाने अर्ज केले, तर काहींनी बनावट कागदपत्रांचा वापर करून योजनेचा लाभ उचलला आहे. यामुळे आणि सरकारी यंत्रणेतील त्रुटींमुळे सरकारी निधीचा गैरवापर झाला. आतापर्यंत एकूण अडीच कोटी महिला लाभार्थींपैकी सुमारे २६ लाखांहून अधिक अपात्र व्यक्तींनी, म्हणजेच अपात्र महिला आणि पुरुष या दोघांनीही या योजनेचा लाभ घेतला. यामध्ये प्रामुख्याने ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा महिला आहेत. त्या आयकरदाता कुटुंबातील आहेत किंवा सरकारी नोकरीत आहेत. काही प्रकरणांमध्ये बनावट उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केली गेली आहेत. विशेषत: गोंदिया आणि भंडारा नगर परिषदांमध्ये हजारो अपात्र महिलांची यादी जाहीर झाली आहे, ज्यामध्ये उत्पन्न मर्यादा ओलांडणाऱ्या महिलांचा समावेश आहे.

या अपात्र बहिणींमध्ये निवृत्त महिला कर्मचाऱ्यांसह ९,५२६ सरकारी महिला कर्मचाऱ्यांचा समावेश होता, ज्या सर्वच या योजनेच्या निकषांनुसार अपात्र होत्या. या महिलांनी त्यांचे सरकारी कर्मचारी असल्याचे तथ्य लपवले आणि पूर्णपणे अपात्र असूनही लाभ उचलला. यातील संतापजनक बाब म्हणजे नोकरीत असणाऱ्यांसोबतच बहुतांश सेवानिवृत्त महिला उत्तम निवृत्तिवेतन घेणाऱ्या असल्याचे आढळून आले आहे. सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याने योजनेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला आणि सामान्य महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला. योजनेसाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला आणि बँक खात्याचा तपशील यांचा समावेश आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर करून अर्ज सादर केले गेल्याची चीड आणणारी बाब उघड झाली आहे. काही अर्जांमध्ये बनावट उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केली गेली, ज्यामुळे अपात्र व्यक्तींना लाभ मिळाला. याशिवाय, आधार कार्ड आणि बँक खात्याच्या तपशिलात फेरफार केल्याचेही आढळले. याबाबत स्पष्ट आकडेवारी उपलब्ध नसली, तरी एकाच गोंदिया नगर परिषदेने चक्क २७,००० अपात्र महिलांची यादी जाहीर केली, ज्यामध्ये बनावट कागदपत्रांच्या वापराचे स्पष्ट संकेत आहेत. यावरून अशा काही गावांमध्ये एखादी अशी कामे करणारी यंत्रणाच तर अस्तित्वात आली नव्हती, अशा संशयालाही वाव आहे. लाडकी बहीण योजनेच्या सुरुवातीला अर्ज तपासणी प्रक्रिया कठोर नव्हती. त्यामुळेच अपात्र अर्ज मंजूर झाले. यामागे प्रशासकीय यंत्रणेची अपुरी तयारी आणि कमकुवत तपासणी यंत्रणा कारणीभूत आहे. काही प्रकरणांमध्ये, राजकीय दबावामुळे अपात्र अर्जांना मंजुरी देण्यात आल्याचीही बाब समोर आली आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत काही प्रमाणात का होईना गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळाले. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर योजनेला गती देण्यासाठी तपासणी प्रक्रिया सौम्य करण्यात आली, ज्यामुळे अनेक अपात्र लाभार्थींना आणि त्यांना घुसवणाऱ्यांना मोकळे रान मिळाले. लाडकी बहीण योजनेतील गैरप्रकारांमुळे २१.४४ कोटींचा निधी अपात्र 'पुरुष' लाभार्थींपर्यंत पोहोचला आहे. तर दुसरीकडे एकूण २६ लाखांहून अधिक अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. अशा योजनाबद्ध 'अपात्रां'मध्ये प्रामुख्याने महिलाच आहेत, हे दुर्दैव. अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याने खऱ्या गरजू महिलांना लाभ मिळण्यात विलंब झाला किंवा काहींना लाभ मिळालाच नाही. गैरप्रकार उघड झाल्याने प्रशासकीय यंत्रणेच्या उरावर तपासणी व दुरुस्तीचे काम येऊन पडले आणि योजनेची गती मंदावली.

महाराष्ट्र सरकारने काय उद्देश डोळ्यांसमोर ठेवून ही 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली हे स्पष्ट आहे. महिलांना काहीतरी रक्कम स्वत:ची वाटावी, ती खर्च करण्याचे अधिकार आपल्याला असावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. या योजनेतील २.५ कोटी लाभार्थींपैकी अक्षरश: लाखो बहिणींना आयुष्यात कधीही 'बँक खाते आणि त्यात आपले दीड हजार रुपये' असा अनुभव नव्हता. एका दृष्टीने विचार केला तर सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा सरकारी तिजोरीतून खर्च आणि त्यात कवडीचाही भ्रष्टाचार नाही, अशी ही योजना आहे. कारण बहिणीच्या खात्यात पूर्ण १५०० रुपये थेट जात होते. त्यासाठी त्यांना कोणालाही काहीही द्यावे लागत नव्हते. ४० हजार कोटी रुपयांच्या कामांमध्ये ३४ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होतो, एक रुपयापैकी फक्त पंधराच पैसे कामी लागतात, असे आपले पंतप्रधान राजीव गांधी यांनीच सांगितले होते. त्या पृष्ठभूमीवर तर ४० हजार कोटी रुपयांच्या व्यवहारात एका रुपयाचाही भ्रष्टाचार नाही, अशी ही एकदम 'स्वच्छ' योजना होती. पण लोकांची मानसिकताच पाहा कशी पार रसातळाला गेली आहे. अडीच कोटींपैकी ३६.३४ लाख बहिणी अपात्र ठरणे, १५ हजार पुरुषांनी 'बहीण' असल्याचा बनाव करणे, एका योजनेची लाभार्थी असताना हीसुद्धा लाटणे, वय आणि उत्पन्नमर्यादा धाब्यावर बसवून, सरकारी पगार, निवृत्तिवेतन घेत असणाऱ्या महिलांनीही विविध लांड्यालबाड्या करून हे सारे केल्याचे आता उजेडात आले आहे. हे सारे केले किती रुपयांसाठी, तर फक्त १५०० रुपये महिन्यासाठी. जराही लाज नाही. ज्यांचे कवडीचेही उत्पन्न नाही किंवा कुटुंबाचे मर्यादित उत्पन्न आहे अशांसाठीच, असे वारंवार सांगितल्यानंतरही २५ लाखांपेक्षा जास्त 'लबाड बहिणी' आणि पंधरा हजार 'निर्लज्ज पुरुष' सापडावेत यापेक्षा लाजिरवाणे आणि किळसवाणे काय असू शकते..? या सर्वांना योजनेबाहेर काढण्यात तर येणारच आहे. पण जवळपास १० हजार सरकारी कर्मचारी महिलांनीही स्वत:बद्दल खोटी आणि सरकारची दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांना एका फटक्यात घरी बसवायला हवे आहे. दुसरीकडे स्वत:ला महिला दाखवून बहीण म्हणवणाऱ्या तथाकथित केविलवाण्या पुरुषांचेही 'वस्त्रहरण' करून फौजदारी झटके द्यायला हवे आहेत, ही साऱ्या महाराष्ट्राचीच इच्छा आहे आणि त्यात अनपेक्षित असे नक्कीच काहीही नाही..!

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# कौशल्यवाद अंगीकारण्याचे आव्हान

आजघडीला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. सध्या विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत; ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते आणि म्हणूनच या मंदीचा जास्त बाऊ करू नये. कारण या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आणि देदीप्यमान यश मिळवण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात केलेली माणसे ऊर्फ 'स्किल्ड मॅनपॉवर' आपल्याकडे उपलब्ध आहे. २०३५ पर्यंत आपण एका विकसित देशाचे नागरिक असू हे नक्की आणि त्यातून आपण एका वेगळ्या मार्गाने जगावर राज्यही करू शकू. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट! आपल्या देशाची वाढती लोकसंख्या ही पहिलेपासून एक मोठी समस्या मानली गेली आहे आणि त्यानुसार लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध उपायही योजले गेले. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता मिळवण्यासाठी वापरता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही. केवळ कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लोक सामावून घेतले जाऊ शकत नाहीत. त्यामुळे औद्योगिक विकास महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी उत्पादन आणि सेवाक्षेत्रांना कुशल आणि कार्यक्षम लोक आवश्यक असतात. देशातील तरुणांना उत्तम शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची नितांत गरज आहे. आज मात्र वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या या मनुष्यबळाचा योग्य वापर करण्याची वेळ आली आहे.

मोठा तरुणवर्ग उपलब्ध असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरासरी वयोमान वाढत चालले आहे. झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या या जगातला तरुणाईचा फार मोठा साठा आपल्याकडे आहे, ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. या वर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतीलच, शिवाय हे तरुण-तरुणी जागतिक पातळीवर काम करतील तेव्हा भरपूर पैसा कमावतील आणि त्यापैकी मोठा हिस्सा बचतीच्या रूपाने भारतातच परत पाठवतील. यामुळे भारताचे सकल उत्पन्न तसेच उत्पादकता वाढेल आणि इथल्या तरुणवर्गाच्या निर्मितिक्षम मनाला संधीही उपलब्ध होतील. आज देशात दिसणाऱ्या परिवर्तनांमध्ये या मानवी भांडवलाचा मोठा हिस्सा तर आहेच, परंतु गेल्या काही वर्षांमधल्या एकंदर अस्थिर स्थितीमधून पुन्हा जोमाने वर येण्यासाठी देशाला या जोमदार, चळवळ्या लोकांचाच उपयोग



होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य या पूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या क्षेत्रांकडे नजर टाकल्यास हा फरक नक्कीच जाणवेल. याखेरीज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही धडाडीचे नवे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहेत. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. यानंतर आपल्याकडे बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल सायन्स तसेच तंत्रज्ञानाच्या इतर बाबींमध्ये या नवीन ज्ञान आणि उद्योगशाखांचे विस्तारीकरण सुरू होईल. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षमता वाढेल आणि शिकलेल्या तरुण पिढीला रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल. दर्जेदार व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढल्यास आणि सरकारी पातळीवरही पुरेसे प्रयत्न आणि वचनबद्धता दिसल्यास २०३० पर्यंत सर्वांना रोजगार मिळणेही शक्य होईल. अर्थात या फार मोठ्या संधीचा फायदा मिळवण्यासाठी मनोवृत्ती बदलावी लागेल. तसे न झाल्यास धोरणांच्या अंमलबजावणीतल्या संथपणामुळे लोकसंख्या हे देशापुढचे फार मोठे संकट ठरेल. एकीकडे शिकलेल्या लोकांना रोजगार मिळत नाही तर दुसरीकडे उद्योग-व्यापाराला योग्य माणसे मिळत नाहीत. हा आपल्या शिक्षणपद्धतीचा दोष आहे. आपल्या शिक्षणाचा ऱ्हास व्हायला कारण आहे ती इंग्रजांनी लादलेली व आपण अंगीकारलेली मेकॉलेची शिक्षणपद्धती. सांगकामे नोकर तयार करणाऱ्या या पद्धतीचा विकास इंग्रज राज्यकर्त्यांना या देशावर पिढ्यान्‌पिढ्या राज्य करता यावे यासाठी केला गेला. पाठांतरावर आधारित 'घोका आणि ओका' अशी ही पद्धत परीक्षार्थी विद्यार्थी आणि मर्यादित शिक्षण या पायावर उभी राहिली. पाठांतर न जमणारा या पद्धतीत मागे पडतो. यात कौशल्यविकासाला बिलकूल स्थान नाही.

गुगलच्या जमान्यात या पद्धतीला बिलकूल स्थान नाही. अधिक गुण म्हणजे उत्तम भविष्याची खात्री, या समीकरणाने गुणांचे कारखाने उघडले. मात्र, कौशल्यविकास तिथेच संपला. संकल्पना समजून घेणे मागे पडले. इंग्लंडची शिक्षणपद्धती मुख्यत्वे व्यावसायिक-कौशल्यकेंद्रित आहे. अमेरिकेतील शिक्षण विद्यार्थ्यांची चौकस मनोवृत्ती तयार करते. विद्यार्थ्याला तंत्रज्ञाच्या हाताखाली प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे त्याचे कौशल्य उच्च दर्जाचे असते. त्याला चांगले उत्पन्न आणि प्रतिष्ठा मिळते. जर्मन मालाच्या उच्च दर्जासाठी जर्मन डिझाईन आणि तंत्रज्ञान जितके कारणीभूत आहे, तितकेच तेथील कामगाराचे कौशल्य, कसब महत्त्वाचे आहे. अमेरिकन शिक्षणपद्धती कष्टाळू, बुद्धिमान आणि कर्तबगार लोकांना वाव देणारी आहे. कौशल्यप्राप्त कामगार मिळत नसल्यामुळे भारतातील मोठमोठे उद्योग, आऊटसोर्सिंग करून आणि सब-कॉंट्रॅक्ट देऊन आपले काम करून घेतात. या पृष्ठभूमीवर आता विद्यार्थी नोकरीला लागणारे सर्व ज्ञान आणि कौशल्य संपादन करूनच नोकरीत शिरला पाहिजे. उद्योगसमूहांनी आपले तज्ज्ञ, शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पाठवले पाहिजेत. त्यांनी आपल्या गरजा आणि आवश्यकता निर्देशित केल्या पाहिजेत. उच्च ज्ञान आणि कौशल्य अवगत करण्यासाठी त्या क्षमतेचे आणि ध्येयवादाचे शिक्षक नेमले पाहिजेत. अमेरिकन विद्यापीठातील शिक्षकांचा ६० ते ८० टक्के वेळ संशोधनात, संशोधन निबंध प्रकाशित करण्यात, नवीन अभ्यासात, पुस्तके लिहिण्यात जातो. ते उरलेला वेळ वर्गात शिकवण्यासाठी वापरतात.

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाची किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची फार मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. येत्या काळात संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येणार असून देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना वाजवी किमतीत उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल. एकंदरीत, बदलत्या काळानुसार सर्व पातळ्यांवर नवी धोरणे ठरवून अंमलबजावणी केली तरच आपल्या देशाची वाढती लोकसंख्या संकट न ठरता वरदान बनेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# आता तरी काँग्रेसचे डोळे उघडतील का?

संसदेत अखेर पहलगाम येथील अतिरेकी हल्ला तसेच त्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवणाऱ्या ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी लोकसभा आणि राज्यसभेत या चर्चेला प्रारंभ केला. लोकसभेत या चर्चेचे उत्तर अपेक्षेप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले. मोदी यांनी आपल्या जवळपास दोन तासांच्या घणाघाती भाषणात विरोधकांच्या सर्व आक्षेपांचे आणि आरोपांचे मुद्देसूद निराकरण करत त्यांच्या आरोपातील हवा काढून घेतली. ऑपरेशन सिंदूरबाबत 'दुध का दुध पानी का पानी झाले'.

लोकसभेत गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्यासह सर्व वक्त्यांनी काँग्रेस आणि गांधी घराण्याचे शब्दश: वाभाडे काढले. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंपासून इंदिरा गांधी यांच्यासह आतापर्यंत झालेल्या काँग्रेसच्या सगळ्याच पंतप्रधानांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले, ते पाहता कुठून आपण ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी करत हात दाखवून अवलक्षण केले, असे आता काँग्रेस नेत्यांना वाटत असेल.

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांनी काँग्रेसचा किल्ला लढवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यांना गौरव गोगोई आणि अन्य काँग्रेस नेत्यांनी तशीच लेचीपेची साथ दिली. लोकसभेत राजनाथसिंह यांनी चर्चेची सुरुवात केल्यानंतर काँग्रेस पक्षातर्फे विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी बोलायला हवे होते, पण काँग्रेसने ती संधी गौरव गोगोई यांना दिली. काँग्रेसची पहिली चूक येथेच झाली. राहुल गांधी बोलले, पण त्याला उशीर झाला. राज्यसभेत राजनाथसिंह यांनी चर्चेला सुरुवात केल्यानंतर काँग्रेसतर्फे पहिले भाषण विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचे झाले, तसे लोकसभेतही व्हायला हवे होते.

गौरव गोगोई यांच्या पत्नीला एका पाकिस्तानी एनजीओकडून वेतन मिळत असल्याचा तसेच त्यांची पत्नी आणि मुले भारतीय नागरिक नसल्याचा आरोप आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांनी करत खळबळ उडवली होती. तुम्ही १५ दिवसांसाठी पाकिस्तानात गेला होता का, अशी विचारणाही त्यांनी गौरव गोगोई यांना केली होती. त्यामुळे भाजपाला गोगोई यांना खिंडीत गाठण्याची आयतीच संधी मिळाली. गौरव गोगोई यांनी हिमंता बिस्व सर्मा यांचे आरोप फेटाळले. मी आणि माझी पत्नी पाकिस्तानी एजंट नसल्याचे सिद्ध झाले तर तुम्ही राजकारण संन्यास घेणार का, असे प्रतिआव्हान गोगोई यांनी दिले होते. या आरोप-प्रत्यारोपाचा संदर्भ देत तुमच्यासारखा मी वारंवार पाकिस्तानात जात नाही, असा टोला गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना आपल्या भाषणात लगावला. गौरव गोगोई यांना या विषयावर भाषणाची पहिली संधी देत काँग्रेसने आपली बाजू कमकुवत करून घेतली, असे म्हणायला हरकत नाही.

खरं म्हणजे काँग्रेसकडे परराष्ट्र व्यवहार विषयातील तज्ज्ञ असलेले शशी थरूर आणि अन्य अनेक नेते होते. पण काँग्रेसने थरूर आणि मनीष तिवारी आदी नेत्यांना बोलण्याची संधी दिली नाही, म्हणण्यापेक्षा नाकारली, असे म्हणणे अधिक योग्य ठरले असते. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी राज्यसभेत या विषयावर बोलल्या नाहीत. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी काँग्रेसची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. खडगे काँग्रेसमधील सर्वांत अनुभवी नेते आहेत, त्यांच्या भाषणात अनेक मुद्दे असतात, पण ते बोलताना अडखळतात, वक्तृत्व नसल्यामुळे त्यांना ते प्रभावीपणे मांडता येत नाही. त्यामुळे काँग्रेसची दोन्ही सभागृहांत गोची झाली. ऑपरेशन सिंदूरवर काँग्रेसचे मुख्य लक्ष्य पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह होते. पहलगाम अतिरेकी हल्ल्यासाठी जबाबदार असल्याचा आरोप करत काँग्रेस नेत्यांनी अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धबंदी मी घडवून आणली, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेकवेळा केला. ट्रम्प यांच्या या दाव्याचा आधार घेत काँग्रेसचा मोदी यांना खिंडीत गाठण्याचा प्रयत्न होता. ट्रम्प यांच्या दबावात मोदी यांना युद्धबंदीची घोषणा करावी लागली, असा काँग्रेसचा आरोप होता. इंदिरा गांधींमध्ये होती, त्याच्या ५० टक्केही हिंमत पंतप्रधान मोदी यांच्यात असती, तर त्यांनी ट्रम्प यांना खोटारडे ठरवले असते, असे राहुल गांधी म्हणाले होते. मोदी सरकारमध्ये राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याचा आरोपही गांधी यांनी केला होता.

मोदी यांनी आपल्या भाषणात डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता, अतिशय सफाईने त्यांचा दावा खोडून काढला. जगातील कोणत्याच नेत्याने ऑपरेशन सिंदूर थांबवण्यासाठी आपल्यावर दबाव आणला नाही, असे मोदी यांनी लोकसभेत स्पष्ट करत राहुल गांधी यांना त्यांची जागा दाखवली. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी काय असते, हे राहुल गांधी यांना समजत नाही, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर बोलताना संयम आणि मर्यादा बाळगायची असते, हे राहुल गांधींना समजले असते, तर त्यांचा पक्ष मागील ११ वर्षांपासून विरोधी पक्षात बसला नसता.

मुळात राहुल गांधी आपल्या आजीचा जो दाखला देत आहे, त्या इंदिरा गांधींनी १९७१ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केल्यानंतर अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना पत्र पाठवून पाकिस्तानवर आक्रमण थांबवण्यासाठी दबाव आणण्याची विनंती केली होती, अशी माहिती पुढे आली आहे. ३ डिसेंबर १९७१ ला पाकिस्तानने भारताच्या पश्चिमी सीमांवर हल्ला चढवला होता, त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे ५ डिसेंबर १९७१ ला तेव्हा पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींनी अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांना पत्र पाठवून संकटाच्या या परिस्थितीत हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. भारतातील सरकार आणि जनता आपल्याला विनंती करत आहे की, पाकिस्तानची अनियंत्रित आक्रमकता आणि दुस्साहसच्या भूमिकेपासून मागे येण्यासाठी अमेरिकेने आपल्या प्रभावाचा उपयोग केला पाहिजे. इंदिरा गांधी आणि रिचर्ड निक्सन यांच्यातील हा पत्रव्यवहार राष्ट्रीय अभिलेखागारात 'निक्सन प्रेसिडेन्शियल मटेरियल' या नावाने आजही उपलब्ध आहे. काँग्रेस नेत्यांना त्यांची लायकी दाखवण्यासाठी भाजपाने हा पत्रव्यवहार देशासमोर आणला आहे. काँग्रेस नेत्यांचे विशेषत: राहुल गांधींचे आरोप म्हणजे उचलली जीभ लावली टाळूला या प्रकारातील आधीही होते आणि आताही आहे. नेता तोच असतो, ज्याला युद्ध कधी थांबवावे, याचा अंदाज असतो. युद्धात तुम्ही जिंकले तरी अंतिमत: तुमचेही नुकसान होतच असते. कौरव आणि पांडवाच्या युद्धात पांडव जिंकले तरी शेवटी त्यांना आपले सर्वस्व गमावूनच विजय मिळाला होता. त्यामुळे कोणतेही युद्ध सुरू करताना आधी आपले उद्दिष्ट ठरवायचे असते, ते उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर युद्ध थांबवण्यात काही गैर नसते. उलट त्यातच देशाचे आणि देशातील जनतेचे व्यापक हित असते. यावेळी तर युद्धबंदीसाठी पाकिस्तानी लष्करच भारतीय लष्कराजवळ गयावया करत होते. भारताची ही लढाई पाकिस्तानातील अतिरेक्यांविरुद्ध आणि त्यांच्या नेत्यांविरुद्ध होती. भारताने पाकिस्तानातील अतिरेक्यांचे सर्व अड्डे आणि प्रशिक्षण शिबिरे उद्‌ध्वस्त केली. यात शंभरावर अतिरेकी मारले गेले, हे लक्षात घेतले पाहिजे.

९८८१७१७८१७

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# जिओ-पॉलिटिक्स आणि भारत

भारत-पाकिस्तानमधील तणावाला पुन्हा एकदा उधाण आले आणि काही दिवसांतच लष्करी कारवायांच्या पृष्ठभूमीवर दोन्ही देशांमध्ये युद्धविरामाची घोषणा झाली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेद्वारे पाकिस्तानला कठोर संदेश दिला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भारताने पाकिस्तानची शेकडो क्षेपणास्त्रे, ड्रोन्स निष्प्रभ केले. हे यशस्वी अभियान ठरले हे मान्य करावेच लागेल. परंतु, अचानक युद्धविरामाचा निर्णय घेतल्यावर राजकीय पातळीवर चर्चा सुरू झाली. या निर्णयामागे नेमके कारण काय? जागतिक दबाव, आर्थिक वास्तव, की भारताची स्वतंत्र सामरिक रणनीती? हाच आजच्या वादाचा केंद्रबिंदू आहे. जिओ-पॉलिटिक्स म्हणजे केवळ भूगोलावरून होणारी सत्ता-स्पर्धा नव्हे, ती म्हणजे अर्थकारण, संरक्षण, आंतरराष्ट्रीय आघाड्या आणि राजकीय हेतूंचा गुंता. भारतासारख्या उदयोन्मुख महासत्तेला प्रत्येक पाऊल मोजून टाकावे लागते. कारण एकीकडे चीन-पाकिस्तानची जवळीक वाढतेय, तर दुसरीकडे अमेरिका आणि पाश्चिमात्य देश भारताकडून शांततेची अपेक्षा ठेवत आहेत. त्यामुळे भारत कितीही सक्षम असला, तरी युद्ध लांबवणे म्हणजे स्वत:च्याच अर्थव्यवस्थेला घाव घालणे. या पृष्ठभूमीवर युद्धविराम अपरिहार्य ठरल्याचे स्पष्ट दिसते. तथापि, देशांतर्गत राजकारण वेगळ्याच पटावर खेळले जात आहे.



काँग्रेससह विरोधी पक्षांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. प्रियांका गांधींनी संसदेत थेट प्रश्न विचारला, युद्धविरामाची घोषणा भारतीय पंतप्रधानांनी न करता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी का केली? तसेच पहलगाम हल्ल्यात झालेल्या सुरक्षेच्या त्रुटींवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. मरण पावलेले हे फक्त हिंदू किंवा मुस्लिम नव्हते, ते भारतीय होते, असे सांगत पीडितांच्या धर्मानुसार वर्गीकरण केल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने या आरोपांना ठाम उत्तर देण्याचा प्रयत्न केला. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी स्पष्ट केले की युद्ध थांबवण्याचा निर्णय पूर्णपणे भारताचा होता आणि तो सामरिक उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर घेतला गेला. पंतप्रधान मोदींनीही या कारवाईतील यश संसदेत मांडले आणि शेकडो पाकिस्तानी क्षेपणास्त्रे व ड्रोन्स नष्ट केल्याची माहिती दिली. सरकारचा सूर स्पष्ट होता. भारत कोणत्याही परकीय दबावाखाली झुकणार नाही. मात्र प्रश्न उरतो जागतिक राजकारणाचा प्रभाव खरंच नव्हता का? या संदर्भात वास्तव सांगते की युद्ध म्हणजे केवळ रणांगणातील लढाई नसते. ती आर्थिक, कूटनीतिक आणि तांत्रिक स्तरावरील स्पर्धा असते. लांबलेले युद्ध भारतासाठी चलनवाढ, गुंतवणूकदारांचा विश्वास, आंतरराष्ट्रीय प्रतिमा यावर गंभीर परिणाम करू शकले असते. त्यामुळे अमेरिकेसह जगातील शक्तिशाली देशांकडून आलेल्या आवाहनांकडे भारताने दुर्लक्ष केले नसावे. हे मान्य केले, तरी अंतिम निर्णय हा भारतीय नेतृत्वाचाच होता, हे नाकारता येत नाही. काँग्रेसची टीका काही बाबतीत रास्त आहे. पहलगाम हल्ल्यात गुप्तचर यंत्रणा कुठे अपयशी ठरली याचा शोध घ्यावा लागेल. कारण अशा त्रुटी राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करतात. मात्र अमेरिकेच्या घोषणेवरून राजकीय वातावरण पेटवणे, हा विरोधकांचा थोडा अतिरेक वाटतो. कारण युद्ध केवळ देशभक्तीचा विषय नाही; तो वास्तववादी कूटनीतीचा भाग आहे. या संपूर्ण प्रकरणातून एक गोष्ट स्पष्ट झाली. भारत कितीही सक्षम झाला, तरी जिओ-पॉलिटिक्सच्या छायेतून कोणीही सुटू शकत नाही. जागतिक समीकरणे, सामरिक हितसंबंध आणि आर्थिक परिणाम लक्षात घेऊनच निर्णय घ्यावे लागतात. सरकारनेही विरोधकांच्या आरोपांवर फक्त प्रत्युत्तर देण्यापेक्षा पारदर्शक संवाद साधणे गरजेचे आहे. कारण शेवटी प्रश्न हा कोण जिंकले याचा नाही, तर देश सुरक्षित राहिला का, हे ठरवणे महत्त्वाचे आहे. युद्धात विजय आणि राजकारणात यश दोन्ही तात्पुरते असतात. परंतु दीर्घकाळ टिकणारा घटक म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा. म्हणूनच या घटनेतून धडा घेऊन भारताने भविष्यातील धोरण अधिक सशक्त करणे हेच खरे देशहित होय.

विरोधकांचा आवाज लोकशाहीत आवश्यक आहे, पण तो वास्तवावर आधारित असावा. सरकारनेही प्रश्न टाळू नयेत, तर स्पष्ट आणि ठोस पावले मांडण्याची गरज आहे. भारतातील जनतेसाठी सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा आणि त्यावर कुठलीही तडजोड नक्कीच देशाला परवडणारी नाही. हे देखील विरोधकांनी व सत्ताधाऱ्यांनी ध्यानात ठेवायला हवे.

९९२२९९९५८८

## वाचक पत्रे

### तुळशीचे अनन्यसाधारण महत्त्व

तुळस ही हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानली जाते. भगवान विष्णू आणि इतर देवतांना तुळस प्रिय आहे त्यामुळे तिच्या पूजेला विशेष महत्त्व आहे. तुळशीत रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे गुणधर्म आहेत. तुळस घराच्या अंगणात किंवा परसबागेत तसेच आजकाल बाल्कनीत लावली जाते. ती लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते. या व्यतिरिक्तही तुळस हा आयुर्वेदात अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. याचे अनेक औषधी उपयोग आहेत. याच पृष्ठभूमीवर तरुण भारतच्या शताब्दीनिमित्त एक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आपणही या सत्कार्याचा आदर करूया. आपल्या परिसरातील किंवा कोठेही मंदिर, मठ इत्यादी स्वच्छता मोहीम आणि तुळस लागवड उपक्रम राबविला जात आहे. त्यासाठी आपल्या घरात जास्तीत रोपे लावून मंदिर किंवा मठ येथे नेऊन द्यावीत. तेथे अधिक लागवड करण्यास प्रवृत्त करावे. हा उपक्रम पर्यावरण पूरक, धार्मिक आणि संस्कृतीची जपणूक करणारा आहे. तसेच नुसतीच लागवड करणे पुरेसे नाही तर त्याची काळजी घेणे आणि संवर्धन करणेही आवश्यक आहे. त्यायोगे आपण स्वच्छ, निरोगी वातावरण निर्मिती करूया तसेच सामाजिक कर्तव्य पार पाडू.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### सेलिब्रेशन असावे, अवडंबर नको!

भारतीय संस्कृतीत उत्सवांना विशेष महत्त्व आहे. प्रदेशानुसार वर्षभर निरनिराळे उत्सव, व्रतवैकल्ये करण्यात येतात. या सगळ्यांमध्ये चातुर्मासाला विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रात आषाढी एकादशीपासून पांडुरंगाचे दर्शन घेऊन सुरू झालेला व्रतवैकल्यांचा महोत्सव पांडुरंगाला प्रिय असलेल्या तुळशी विवाहापर्यंत सुरू असतो. या सगळ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे उच्चतम दर्शन होते. आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, पोळा, गौरी-गणपती, महालय श्राद्ध, आश्विन नवरात्र, दसरा-दिवाळी इत्यादी सगळ्यांमध्ये ऋतू परिवर्तनासोबत होणाऱ्या मानवी जीवनाचा तसेच, निसर्गात होणाऱ्या बदलांचा विचार करून सणांची गुंफण केलेली आहे. या निमित्ताने मानवी स्वास्थ्य आणि नैसर्गिक स्वास्थ्य याचे संतुलन टिकून राहण्यासाठी अनेक निरनिराळ्या पद्धतीचे व्रत सांगितलेले आहे. परंतु, हल्ली या सगळ्यांकडे एका निराळ्या दृष्टिकोनातून बघण्यात येते. कोणी याला थोतांड समजून ते करू नका, यासाठी प्रपोगंडा करतात, तर कोणी आधुनिकतेचा आव आणून आरास, वेशभूषा, केशभूषा, अलंकार, याकडे फॅशनच्या दृष्टिकोनातून बघतात आणि उत्सवातील पारंपरिक पद्धती केवळ औपचारिकता म्हणून राहतात.

आपल्या व्रतवैकल्यांमध्ये खूप गहन आशय आहे. त्याचा अभ्यास करून त्यानुसार आचरण करण्याची गरज आहे. याचा अर्थ असा नाही की, आरास आणि अन्य गोष्टींकडे दुर्लक्ष करा, परंतु मूळ उद्देशापासून भरकटू नका. शास्त्र जाणून घ्या आणि शास्त्राला धरून आवश्यक ती प्रत्येक कृती करा, सेलिब्रेशन असावे, अवडंबर नको. एवढेच सांगणे आहे!

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

### नरभक्षी वाघाने घेतला सहावा बळी

२९ जुलैच्या तरुण भारतात उपरोक्त बातमी वाचण्यात आली. गावातील नागरिकांचा वाघाने बळी घेतला अशा बातम्या पेपरमध्ये सातत्याने सध्या दिसतात. वाघाला जेरबंद करण्याकरिता वनविभागाने ठोस उपाययोजना केल्या नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. ग्रामस्थांना शेतात काम करणे व तेंदुपत्ता इत्यादी कामांकरिता जंगलात जावे लागते. तथापि, ग्रामस्थांमध्ये सध्या नरभक्षी वाघांमुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये पर्यटकांची वाढती गर्दी दिसते. मात्र त्याचवेळी तेथे मानव-वन्यप्राणी संघर्षही अत्यंत गंभीर होत आहे, असेही दिसते. मे महिन्यात एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात १५ बळी गेले. तेंदुपाने तोडणाऱ्या महिलांपासून गुराख्यांपर्यंत अनेकांचे संसार उद्‌ध्वस्त झाले. व्याघ्र संवर्धनाच्या यशाखाली दडलेली मानवी वेदना, सुरक्षिततेच्या अपुऱ्या उपाययोजना यामुळे ग्रामस्थांचा संताप वाढतो आहे.

चंद्रपूर हा व्याघ्र संरक्षण क्षेत्रात देशात आदर्श ठरलेला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा जिल्हा. याची ही दुसरी बाजू मात्र दु:खद व अस्वस्थ करणारी आहे. एका बाजूला लाखो रुपये खर्च करून वाघ बघण्यासाठी येणारे पर्यटक आणि दुसऱ्या बाजूला वाघांचा बंदोबस्त करा अशी कळकळीची मागणी करणारे स्थानिक हा विरोधाभास चंद्रपूरचे वास्तव अधोरेखित करतो. वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या कुटुंबीयांना वनविभागाने आता दोन कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी रोखठोक भूमिका माजी मंत्री राजेंद्र मुळक त्यांनी मांडली आहे. केवळ २५ लाख रुपये देत वनविभाग गरिबांची व शेतकऱ्यांची एकप्रकारे थट्टा करीत आहे असेही त्यांचे म्हणणे आहे. यावरून असे वाटते की व्याघ्र संवर्धनाचे फलित चुकलं का? माणूस चुकतोय की वाघ? की व्यवस्था? वाघाला दोष देणं सोप आहे, पण प्रश्न खोल आहे. कोण जबाबदार आहे या मृत्यूसाठी? वन उपजाचा अतिरेक होतोय का? आणि किती मृत्यूंची वाट बघायची? हे असे सुरू राहणार? की आपण काही शाश्वत उपाययोजना करू शकतो? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधून फक्त जंगलांच नव्हे तर माणसांचीही रक्षण करणं, ही खरी व्याघ्र संवर्धनाची कसोटी आहे. वाघांची संख्या वाढली की माणसाने जंगलावर अतिक्रमण केले? की वाघांनी शहरावर अतिक्रमण केले. याचा विचार होऊन वाघांकडून नरबळींवर आळा बसला पाहिजे असे वाटते.

**शशिकांत दलाल**/ ९८२२३६५१९०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### आनंद विद्यालयात २०० विद्यार्थ्यांना कौशल्यविकास किट वाटप

कौशल्य विकास मंत्रालयाद्वारे १४०० किट उपलब्ध

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील आनंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि.२८) २०० विद्यार्थ्यांना मोफत कौशल्य विकास किटचे वाटप करण्यात आले.

कौशल्य विकास मंत्रालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी मोफत १४०० कौशल्यविकास किट उपलब्ध झाल्या आहेत. त्यापैकी २०० कौशल्य विकास कीट येथील आनंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या वाटप करण्यात आल्या. यावेळी आयटीआय आयएमसी सदस्य व समाजभूषण प्रा. सौ. रमाताई शेजावळे, तसेच कौशल्य विकास मंत्रालयाचे नांदेड येथील समन्वयक सचिन नरंगाळे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या शेळके होत्या. मुख्याध्यापक श्रीधर कोके, तसेच विद्यालयातील शिक्षकवृंद, विविध मान्यवर आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती कार्यक्रमात होती.

कार्यक्रमात भालचंद्र गोरे, प्रभावती अन्नपूर्वे, रूपाली ठाकरे, मनीषा जाधव, संतोष जाधव, भागवत भरोसे सर, बाळासाहेब कदम सर, ठोंबाळ सर, शिरसाट सर, शिंदे मॅडम, खूपसे मॅडम, बेंद्रे सर, प्रवीण गायकवाड सर, पांडुरंग भरोसे, चकोर सर, राऊत सर, डाके सर, आढे सर, झाडे सर यांचाही उपस्थितीत सहभाग होता.

या उपक्रमांतर्गत उर्वरित किट येत्या आठवड्यात परभणी शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये वितरित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून, आधुनिक शिक्षणाची साधने उपलब्ध करून देणारा उपयुक्त टप्पा आहे. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत प्रेरणा दिली.

### चित्रकला स्पर्धेत विविध गटात आरुष माळोदे, आर्या काळे, प्रितेश खरवडे व संहिता नाईक प्रथम

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त परभणी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या भव्य चित्रकला स्पर्धेत विविध गटात आरुष माळोदे, आर्या काळे, प्रितेश खरवडे व संहिता नाईक यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

ही भव्य चित्रकला स्पर्धा पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष व प्रथम महापौर प्रतापभैय्या देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार २७ जुलै रोजी सकाळी १० ते १ दरम्यान एमआयडीसीतील व्यंकटेश मंगल कार्यालयपार पडली. या स्पर्धा दोन गटांमध्ये-५ वी ते ७ वी (लहान गट) आणि ८ वी ते १० वी (मोठा गट)-मुला-मुलींना स्वतंत्र ठेवून आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला परभणी शहर व परिसरातील सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मोठ्या गटातील मुलांमध्ये प्रथम क्रमांक आरुष सुनिल माळोदे (५१००), द्वितीय अद्वैत अविनाश कंधारकर (३१००) व तृतीय ओंकार गणेश लांडगे (२१००) यांनी पटकावले. मुलींमध्ये प्रथम क्रमांक आर्या नरहरी काळे, द्वितीय मृणाल मुरलीधर देशमुख आणि तृतीय सिद्धी हनुमान रणेर यांनी मिळवला. तसेच लहान गटातील मुलांमध्ये प्रथम प्रितेश जगनाथ खरवडे, द्वितीय अतुल जाधव व तृतीय आत्मज रंजिता चांदविले हे ठरले. तर मुलींच्या गटात प्रथम संहिता प्रवीण नाईक, द्वितीय अदिती शिवानंद जमसेटे आणि तृतीय समृद्धी लक्ष्मणराव गारकर यांनी बाजी मारली.

स्पर्धेत मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांचाही सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. त्यांच्यासाठी स्वतंत्र सन्मान ठेवण्यात आले होते. प्रथम क्रमांक अभिषेक चंदू गवारे, द्वितीय शिवकन्या बंडू चापके आणि तृतीय अश्विनी नागोराव खिलारे यांना प्रदान करण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेतील विजेत्यांना प्रतापभैया देशमुख, ज्ञानेश्वर नाटकर, नंदाताई राठोड, रोहन समाले, संजय कदम, शंकर भागवत, दीपक वारकरी, राजेंद्र वडकर, नगरसेवक पंजाब पतंगे, राजू शिंदे, बबन मुळे, चांदुराम बोराडे, बबन मकासरे आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. रामेश्वर आवरगंड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुदाम तूपसुंदरे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुरेश काळे, सुरेंद्र रोडगे, सचिन पाचपुंजे, अनिल गोरे, सचिन सोनटके, रामदास कदम, माणिक भद्रगे, अकबर अली, मोईन खान, शमशू हाशमी, सय्यद अस्लम फौजी, विनोद कणकूटे, माही दांडगे, विनोद खरात, विजय धरणे, विजय काळे, रामभाऊ भवर, संकेत वाकले, वैभव शिंदे, सुरेश प्रधान, माणिक अशोले, शेख इकबाल दावत, किरण लोखंडे, साजिद भाई, विद्या जोंधळे, महादेवी स्वामी, प्रभा हटकर यांचे विशेष योगदान लाभले.

### कपाशी पिकात आकस्मिक मरचं संकट; तातडीने उपाययोजना करण्याचे कृषी विद्यापीठाचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणीसह मराठवाड्यात मोठ्या खंडानंतर पडलेल्या पावसामुळे अनेक शेतांमध्ये कपाशीच्या झाडांना आकस्मिक मर येण्याचे प्रकार वाढले असून, यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता पसरली आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रामार्फत या समस्येवर तातडीने लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ डॉ. जी. डी. गडदे, डॉ. डी. डी. पटाईत व एम. बी. मांडगे यांनी सांगितले की, आकस्मिक मर ही आहेत.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# गळक्या व मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यात विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन

## साळेगाव येथील जिल्हा परिषद शाळातील प्रकार, प्रशासनाचे दूर्लक्ष विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतू शकते

**शिवाजी आकात**

**सेलू/प्रतिनिधी-** गळक्या व मोडकळीसतालूक्यातील साळेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वर्ग खोल्या मोडकळीस आल्या असून या वर्ग खोल्या पावसामूळे गळत असल्याने या धोकादायक वर्ग खोल्यात विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करावे लागत असल्याची वास्तव परिस्थिती आहे.तालूक्यातील साळेगाव येथे जिल्हा परिषदेची इयत्ता १ ते ७ वी पर्यंत प्राथमीक शाळा आहे.





या साळेत एकूण ८९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत एकूण मूख्याध्यापक कार्यालयासह ४ वर्ग खोल्या आहेत मात्र या चार पैकी तीन वर्ग खोल्या मोडकळीस आल्या असून मूख्याध्यापक कार्यालयाच्या वर्ग खोलीच्या भिंतीस जागोजागी तडे गेले आहेत.सदरिल वर्ग खोली पडण्याची भिती असली तरी पावसामूळे या वर्ग खोलीत विद्यार्थ्यांना बसवावे लागत आहे.तसेच पावसाचे पाणी वर्ग खोल्यात साचत असल्याने विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यात बसत येत नाही तर विद्यार्थ्यांना व्हरांड्यात बसून ज्ञानार्जन करावे लागत आहे .दरम्यान अनेक वेळा प्रशासनाकडे वर्ग खोल्या दूरूस्ती बाबत लेखी निवेदने दिली असली तरी सूद्धा सदरिल शाळेच्या वर्ग खोल्या दूरूस्त करण्यात आल्या नसल्याने नाईलाजास्तव विद्यार्थ्यांना पावसाळ्यात व्हरांड्यात बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.दरम्यान या सर्व प्रकाराकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

प्रशासनाचे दूर्लक्ष

वर्ग खोल्या संदर्भात मागील अनेक वेळा जिल्हा परिषद व शिक्षण विभागाकडे अर्ज केले आहेत अनेक वेळा प्रस्ताव मागविले आहे मात्र प्रत्यक्षात प्रशासनाकडून शाळा दूरूस्ती संदर्भात कूठलेही ठोस पाऊल उचलले नाही यामूळे पावसाच्या दिवसामध्ये शाळेच्या वर्ग खोल्यात पाणी साचून विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यात बसण्यासाठी अडचणी येत आहेत.लवकर यासाठी पर्यायी व्यवस्था होणे गरजेचे आहे नसता गटशिक्षण अधिकारी कार्यालयात विद्यार्थ्यांचे वर्ग भरविण्यात येतील.विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ चालविला जात असून या सर्व प्रकारास प्रशासन जबाबदार आहे.

-सूरेखा आकात- उपाध्यक्षा

### सोमवारी परभणीत पावसाची विश्रांती

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरात पावसाने गेल्या दोन ते तीन दिवसापासून उघडदीप दिली आहे. त्यामुळे शेतकरी तसेच सामान्य नागरिक यामुळे परेशान झालेला दिसत आहेत. सध्या पावसाची मोठी आवश्यक ता आहे. त्यातच यावर्षी पावसाने उशिरा आपली हजेरी लावली होती. तसेच मे महिना पूर्ण पावसाने आपले आगमन केले होते. त्यानंतर मात्र पावसाने चांगलीच उघडदीप दिली यामुळे सर्व वातावरणात कमालीचा उकाडा निर्माण झाला होता. त्याचा परिणाम यावर्षी पावसावर झाला आहे.

## वरपूडकर यांच्या पक्ष प्रवेशानंतर परभणीत काँग्रेस झाली पोकळी

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** पक्षप्रवेश सोहळ्यातून वरपुडकर जोरदार शक्तीप्रदर्शन करणार आहेत.

परभणीतून शेकडो गाड्याच्या ताफ्यानिशी हजारो कार्यकर्ते मुंबईस रवाना : उद्या भाजपाच्या प्रदेश कार्यालयात दुपारी ३ वाजता पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आलेले आहे.

दरम्यान परभणी जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री, जिल्हा काँग्रेस कमिटीचे विद्यमान अध्यक्ष तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश वरपुडकर हे मंगळवारी (दि.२८) मुंबईत हजारो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणार आहेत. विशेषतः

**शेकडो गाड्याच्या ताफ्यानिशी हजारो कार्यकर्त्यांचा प्रवेश आगामी मनपा, जि.प.निवडणूकीत काँग्रेसचे काय होणार?**

या पक्षप्रवेश सोहळ्यातून वरपुडकर हे जोरदार शक्तीप्रदर्शन करणार आहेत.

ज्येष्ठ नेते वरपुडकर यांच्या पक्षप्रवेशास भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्ठींनी हिरवा कंदिल दिल्याबरोबर वरपुडकर यांनी शहरासह जिल्ह्यातील त्यांचे पदाधिकारी व समर्थक कार्यकर्त्यांबरोबर गेल्या दोन-चार दिवसांपासून हितगूज करीत पक्षांतराबद्दल माहिती दिली. त्यावेळी बहुतांशी समर्थकांनी त्यांच्या पक्षांतराच्या निर्णयास भक्कम असे समर्थन जाहीर केले. तर बहुतांशी पदाधिकाऱ्यांनी आपण स्वतः या सोहळ्यास हजेरी लावून भाजपात प्रवेश करु, अशी ग्वाही दिली. त्यामुळे वरपुडकर यांनी मोठ्या उत्साहाने पक्षांतराच्या या सोहळ्यातून जोरदार शक्ती प्रदर्शन व्हावे, या संदर्भात निर्णय घेतला. अन् पाठोपाठ शहरासह ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांबरोबर हितगुज करीत व्युहरचना आखण्यास सुरुवात केली.

त्याप्रमाणे सोमवारी सकाळी विष्णू नगरातील वरपुडकर यांचे निवासस्थान समर्थकांच्या गर्दीने अक्षरशः फुलले. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मुख्य शाखेसमोरसुध्दा समर्थकांनी मोठी भाऊगर्दी केली.

### पूर्णेत झालेल्या जोरदार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी

**पूर्णा,प्रतिनिधी-** पूर्णा शहर व परिसरात कालपासून जोरदार पाऊस सुरू झाल्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे.या पावसामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे .पूर्णा तालुक्यात मागील काही दिवसापासून पावसाने दांडी मारल्यामुळे शेतकरी राजा चिंताग्रस्त झाला होता परंतु मागील दोन दिवसापासून पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे शेतातील पिकांना मोठे जीवदान मिळाले या पावसामुळे शेतातील पिके उभरणार असून काल सकाळ पासून पूर्णा शहर व तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.शनिवारी दिवसभर पावसाची रिमझिम चालूच होती रोजप्रमाणे सूर्यदर्शन झाले नाही.जोराच्या पावसामुळे अनेक भागात पाणी साचले आहे तसेच तालुक्यातील पूर्णा माटेगाव पुलावरील मोठ्या प्रमाणात पाणी आले आहे.माटेगाव पुलावरून पाणी जात असल्यामुळे पूर्ण झिरो फाटा परभणी रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे.





**सेलू- महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर उपोषण सुटले माजी आमदार हरिभाऊ लहाने यांची मध्यस्ती झाल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले होते. यावेळी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी आदी दिसत आहेत.**

## हुमणीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे नुकसान; टाकळखोपा ग्रामपंचायतीकडून तहसीलदारांना मदतीसाठी निवेदन सादर

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील टाकळखोपा (श्रीरामवाडी) या शिवारात हुमणी कीटकाच्या प्रचंड प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर टाकळखोपा ग्रामपंचायतीतर्फे तहसीलदार कार्यालय, जिंतूर येथे शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी दि. २५ जुलै रोजी माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे यांच्या उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले.

गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोयाबीन, तूर आणि कापूस यासारखी पिके घेतली होती. मात्र हुमणी कीटकांच्या प्रकोपामुळे सुमारे २०० हेक्टरवर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांपुढे गंभीर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे व गावातील सरपंच सौ.अनुसया भीमराव श्रीरामे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीने सादर केलेल्या निवेदनात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सदरच्या




निवेदनात करण्यात आली आहे. शासनाने तातडीने लक्ष घालून पंचनाम्याची कार्यवाही करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे, शेतकरी दगडु रावघुगे, रावसाहेब घुगे, विश्वनाथ घुगे, नारायण श्रीरामाचे, पांडुरंग श्रीरामाचे, देवाबा दळवे, मारोतराव दळवे, मारोतीराव घुगे, गुलाब पवार, संतोष राठोड, अशोक राठोड, दिलीप जाधव, मंगेश घुगे, ज्ञानोबा घुगे, जेनार्दन घुगे, रावसाहेब मानकरी, दिलीप घुगे, संतोष घुगे, शामराव घुगे, गजानन घुगे, जेगनलि घुगे, अमोल घुगे, कृष्णा घुगे, सुभाष राठोड, देविदास वाघमारे, गजानन घुगे, वसंत गिते, शरद घुगे, सचिन सांगळे, गोपी जाधव, भास्कर पवार, दसरथ वाव्हळ, गणेश देवला, बळीराम वाव्हळ, वामन घनसावत, गजानन माने, साहेबराव लिंगायत, पांडुरंग कुटे, रामकिशन चाटे , ज्ञानेश्वर चाटे, कैलास मानकरी, आजारांवर घुगे, बाबाराव घुगे, रामप्रसाद घुगे, रंगनाथ घुगे, एकनाथ घुगे, नितीन घुगे, साहेबराव राठोड, माधव वाघमारे, गजानन घुगे, गेणेश राठोड, जेगन घुगे, कैलास वाव्हळ, सतिश वाव्हळ, आक्षोबा घुगे, पिराजी घुगे, मदन घुगे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

शुक्रवार, दि. ०१ ऑगस्ट २०२५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## चव्हाण यांची काँग्रेसच्या कार्यकारी समितीवर निवड

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारी समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणू गोपाल यांनी याबाबतचे पत्र पाठवले.



१९५७ पासून राजकारणात सक्रिय असलेले चव्हाण यांनी विविध पदांवर काम करत सामाजिक व शासकीय पातळीवर मोठे योगदान दिले आहे.

आमदार, उपाध्यक्ष, मंत्री, विविध सहकारी संस्थांचे चेअरमन अशी अनेक पदे त्यांनी भूषवली आहेत. त्यांच्या नियुक्तीने जिल्ह्यात काँग्रेसला बळकटी मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून भजनी मंडळाला साहित्य भेट

**लोहारा, दि.३१ जुलै -**

लोहारा तालुक्यातील माकणी येथील कै. कुंडलीक ग्यानदेव मुसांडे गुरुजी व सुनीता कुडलीक मुसांडे यांच्या सुनबाई तर हभप. प्रशांत मुसांडे गुरुजी यांच्या पत्नी हभप. पल्लवी मुसाडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून भजनी मंडळाना साहित्य वाटप करून एक समाजात आदर्श ठेवला आहे. यावेळी हभप. मधुसुदन पुरणे, पुजा ओवडकर दता लोभे, प्रवीण लोभे, प्रवीण कदम, रमाकांत सुरवसे, नवनाथ ताटे, ओमकार दळवी, राम जगदाळे यांच्यासह आदि उपस्थित होते.



### पुजारी नगरमध्ये नागपंचमी सण साजरा


**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

श्रावण महिन्यातील पहिलाच सणानिमित्त पारंपरिक वेशभूषेतील पुजारी नगर सोसायटी मधील महिलांनी नागपंचमी निमित्ताने गाणी गात, फेर धरत तसेच झोक्याचा आनंद घेत उत्साही वातावरणात नागपंचमी साजरी केली. शुभांगी गणेश पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा प्रथमच नागपंचमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पुजारी नगर सोसायटीतील आयोजन नागपंचमी उत्सवात झोके खेळण्यासाठी शेकडो महिलांबरोबर लहान मुलीही मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या.

### सचिवपदी पांडुरंग कुंभार यांची नियुक्ती

**कळंब, दि.३१ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील काँग्रेसचे पांडुरंग गुणवंतराव कुंभार यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी



नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ पांडुरंग कुंभार यांनी युवक काँग्रेसपासून ते स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीपासून ते पक्षाच्या विविध जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. कळंब नगरपरिषदेचे सलग नगरसेवक, उपनगराध्यक्ष, बाजार समितीचे सभापती अशा विविध पदांवर त्यांनी भक्कम नेतृत्व दिले आहे.



### टू व्हीलर प्रशिक्षण कार्यशाळेस प्रतिसाद

**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

नवनिर्मिती प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळ सामाजिक संस्था व शिवसेना महिला आघाडीच्या वतीने शहरातील महिला व युवतींसाठी दि.३० जुलै ते ३ ऑगस्टपर्यंत मोफत पाच दिवसीय टू व्हीलर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेस शहरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून महिला या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेत आहेत. या प्रशिक्षण शिबिरात केवळ महिला युवतींनाच प्रशिक्षण दिले जात आहे.

### सावरगाव येथील हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ


**कळंब, दि.३१ जुलै -**

सावरगाव (पु) येथील हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली असून कलश पूजन गाथा पूजन व ज्ञानेश्वरी पूजनाने या पहिल्या दिवसाची सुरुवात करण्यात आली. या सप्ताह मध्ये असंत चरित्र कथा प्रवक्ते संतोष महाराज पवार यांची भागवत कथा होणार असून नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, महादेव महाराज बोराडे, उमाकांत मिटकरी महाराज, प्रकाश महाराज बोधले, लक्ष्मण महाराज मेंगडे, संतोष महाराज पवार, उद्धव महाराज रमजानपुरकर, यांचे कीर्तन होणार आहे. बुधवार दि.६ तारखेला पालखी सोहळा होणार आहे. सप्ताहाच्या शिवाजी कापसे, श्रीधर बाबा भवर, संजय मुंदडा, सागर मुंडे, सतीश टोणगे यांच्या हस्ते विविध पूजा करण्यात आले.

### गंगाधर आप्पा जळकोटे यांचे निधन

**किलज, दि.३१ जुलै -**

श्री स्वामी समर्थ उद्योग समूहाचे सर्वेसर्वा तसेच समाजप्रिय व्यक्तिमत्व गंगाधर आप्पा जळकोटे (वय



८५) यांचे ३० जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. गंगाधर आप्पा हे शांत स्वभाव, मेहनती वृत्ती आणि सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असणारे व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते. त्यांच्यावर बुधवार, ३१ जुलै रोजी त्यांच्या मूळगावी किलज येथे अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शासकीयकरणाची प्रक्रिया सुरु

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे शासकीयकरण करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, राज्य शासनाने या प्रक्रियेसाठी पाच तज्ज्ञांची समिती गठित केली आहे. या समितीला पुढील सहा दिवसांत (५ ऑगस्टपर्यंत) शासनाला अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयामागे मित्र संस्थेचे उपाध्यक्ष व आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत.

८ जुलै रोजी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या महाविद्यालयाच्या हस्तांतरणासंदर्भात निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ३० जुलै रोजी शासन निर्णयाद्वारे तज्ञ समिती गठित करण्यात आली. या समितीमध्ये किरण लाढाणे, सहसंचालक, तंत्र शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर (अध्यक्ष), डॉ. स्मिता कोकणे, प्रतिनिधी, लेखा व कोषागार संचालनालय,



अरविंद बोळंगे, तहसीलदार व विश्वस्त, तुळजाभवानी मंदिर समिती, डॉ. संजय डंभारे, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, संभाजीनगर, प्रा. रवींद्र आडेकर, प्राचार्य, तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय (सदस्य सचिव) हे असणार आहेत. या समितीने तुळजाभवानी मंदिर समितीमार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचा आढावा घेऊन स्वतंत्र अहवाल शासनाला सादर करायचा आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी या संदर्भात बोलताना सांगितले की, धाराशिव जिल्ह्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कमी शुल्कात दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी आणि जिल्ह्याचा शैक्षणिक व आर्थिक विकास साधावा, या उद्देशाने आपण हा पाठपुरावा करत होतो. आज या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे. या निर्णयामुळे मराठवाड्यातील हे तिसरे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय ठरणार असून, विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्कात लक्षणीय बचत होणार आहे.

त्याचबरोबर संस्थेचा शैक्षणिक दर्जाही वाढण्यास मदत होणार असल्याचा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासकीय; गरीब विद्यार्थ्यांना दिलासा...

तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासकीय करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळणार आहे. आमदार पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर महायुती सरकारने हा निर्णय घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री चंद्रकांत पाटील यांचे आभार मानले जात असून, मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी आरक्षण कायम राहणार आहे. कर्मचाऱ्यांना ७व्या वेतन आयोगानुसार वेतन मिळणार असून, मंदिर संस्थानच्या खर्चात कपात व जिल्ह्याच्या अर्थकारणाला बळकटी मिळणार आहे.

# भूम तालुक्यात ७० वर्षीय आजीवर बलात्कार


## माणूसकीला काळीमा फासणारी घटना ... आरोपीविरूद्ध गुन्ह दाखल...

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.३१ जुलै -**

तालुक्यातील एका गावात ७० वर्षीय वृद्ध महिलेस मोटरसायकलवरून फसवून नेऊन तिच्यावर सोयाबीनच्या शेतात लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून भुम पोलीस ठाण्यात एका अज्ञात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.२० जुलै रोजी संध्याकाळी ६ ते रात्री



१०.३० या वेळेत, एका गावातील अज्ञात तरुणाने संबंधित ७० वर्षीय महिलेस (नाव व गाव गोपनीय) जबरदस्तीने मोटरसायकलवर बसवले. त्यानंतर जीवे मारण्याची धमकी देत, तिला मोटरसायकलवरून खाली उतरवले आणि जवळच्या सोयाबीनच्या शेतात नेत तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केला, असा आरोप तिने आपल्या तक्रारीत केला आहे.

दि.३० जुलै रोजी पीडितेने भुम पोलीस ठाण्यात दिलेल्या प्रथम खबरेवरून, संबंधित आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ६४, ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गंभीर घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

# सेवानिवृत्त ५ अधिकारी-अंमलदारांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.३१ जुलै -**

धाराशिव शहर पोलीस दलातील पाच जेष्ठ पोलीस अधिकारी व अंमलदारांचा सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ आज दि.३१ जुलै रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात पार पडला.




या समारंभाचे आयोजन अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना (प्रभारी पोलीस अधीक्षक) यांच्या हस्ते करण्यात आले. सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारामध्ये पोउनि. मधुकर घायाळ, पोसफौ. बिभीषण लोंढे, राजेंद्र राऊत, उमाकांत माळाळे, पो.ह. उल्हास वाघचौरे यांना सेवानिवृत्तीनिमित्त निरोप देण्यात आला. कार्यक्रमास सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार हे आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित होते.

या समारंभप्रसंगी पोनि. रविंद्र गायकवाड, विविध विभागांचे अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## आ. राणादादा यांचा महसूल मंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

तुळजाभवानी मंदिर आणि शहर विकास आराखड्यासाठी १८६० कोटी निधी मिळवून दिल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सत्कार सोहळा आयोजित केला असल्याची माहिती विनोद गंगणे यांनी दिली आहे.

दि.७ ऑगस्ट रोजी येथील भवानी तीर्थकुंडाच्या परिसरात सर्व शहरवासीयांच्या उपस्थितीत भव्य सत्कार सोहळा होणार आहे.

नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहनही केले आहे.

# गुंजोटी ग्रा.पं. निवडणुकीची चर्चा रंगली; शंकर पाटील भाजपकडून आघाडीवर?

**तभा वृत्तसेवा**

**उमरगा, दि.३१ जुलै -**

उमरगा तालुक्यातील राजकीय दृष्टिकोनातून संवेदनशील समजल्या जाणाऱ्या गुंजोटी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. आगामी निवडणुकीसाठी संभाव्य उमेदवारांच्या चर्चेला गावात उधाण आले असून, माजी सरपंच शंकर पाटील यांचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आहे.

शंकर पाटील हे भाजपचे कट्टर समर्थक असून, बसवराज पाटील यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी भाजपकडून त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. त्यांच्या कार्यकाळातील अनुभव, प्रशासकीय हाताळणी आणि मतदारांमधील जनसंपर्क ही त्यांची जमेची बाजू मानली जात आहे.

मात्र, काही स्थानिक नेत्यांच्या वारंवार बदलणाऱ्या भूमिका आणि राजकीय तडजोडीच्या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांमध्ये विश्वासार्हतेचा मुद्दा चर्चेत आला आहे.

गुंजोटी हे विविध समाज घटकांचे प्रतिनिधित्व करणारे गाव असून, येथे लिंगायत, मुस्लिम, दलित, मातंग, रंगारी आणि धनगर समाजांचे प्रभावी अस्तित्व आहे. गेल्या दोन दशकांमध्ये लिंगायत समाजाकडे सरपंच पदाची धुरा राहिल्याचे दिसून आले आहे. यंदाही शंकर पाटील यांच्यासह पिंटू साखरे, प्रदीप शिवनचारी



राजकीय वार्ता...

आकाश पोतदार

यांसारखे लिंगायत समाजातील उमेदवार रिंगणात असल्याची जोरदार चर्चा आहे.

दरम्यान, युवकांमध्ये एकाच घरातील व्यक्तीला वारंवार संधी का द्यावी? असा सवाल उभा राहत असून, नवीन चेहऱ्यांना संधी मिळावी, अशी जनभावना तयार होत आहे. त्यामुळे निवडणूक लढविणाऱ्यांसमोर केवळ राजकीय अनुभव नव्हे, तर जनतेच्या अपेक्षांनुसार परिवर्तनाचा विचार करणेही महत्त्वाचे ठरणार आहे.

गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत शंकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला ७०० मतांची आघाडी मिळाल्यामुळे त्यांचे राजकीय वजनही अधोरेखित झाले होते.

त्यामुळे भाजपकडून त्यांच्याच नावाला प्राधान्य मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अंतिम उमेदवारांची घोषणा लवकरच होणार असून, गुंजोटी ग्रामपंचायतीची सत्ता कोणाच्या हातात जाते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# ग्रामपंचायत कार्यालयात 'थंब मशीन' सुरू करण्याची भाजप युवा मोर्चाची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.३१ जुलै -**

तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये ग्रामसेवकांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी 'थंब मशीन' सुरू करण्याची मागणी भाजप युवा मोर्चाने केली आहे. या संदर्भातील निवेदन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना देण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालयातील कारभार नियमित आणि पारदर्शकपणे चालवण्यासाठी सर्व कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक 'थंब मशीन' सक्तीने बसवण्यात याव्यात, अशी ठाम भूमिका भाजप युवा मोर्चाने मांडली आहे.

या निवेदनप्रसंगी दिनेश बागल, मनोज माडजे, दयानंद शिंदे, शिवलिंग कोरे, वैभव देशमुख, योगेश रोकडे, सयाजी शिंदे, बुद्धभूषण सोनवणे, आकाश जमदाडे, शुभम सुरवशे, रविराज हांडे, अक्षय कापसे, गुणवंत देशमुख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नळदुर्ग बसस्थानकावर २४ तास अगाऊ आरक्षण केंद्र सुरू करा

## रिपाईची तुळजापूर आगार प्रमुखाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.३१ जुलै -**

नळदुर्ग बसस्थानकावर प्रवाशांच्या वाढत्या संख्येचा विचार करता येथे २४ तास वाहतूक नियंत्रक सेवा तसेच अगाऊ आरक्षण सुविधा सुरू करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड यांनी केली आहे. त्यांनी ही मागणी राज्य परिवहन महामंडळाच्या तुळजापूर आगार प्रमुख राम शिंदे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग हे मुंबई-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५वर वसलेले ऐतिहासिक व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. जवळपास ६५ गावांच्या प्रवाशांचा प्रवास केंद्र म्हणून हे बसस्थानक कार्य करते. ग्रामीण भागातील नागरिकांना कुठेही प्रवास करताना नळदुर्ग बसस्थानकावर यावेच लागते. त्यामुळे येथे दररोज व विशेषतः रात्रीच्या वेळेस लांब पल्ल्याच्या १५ ते २० बसेसची वर्दळ असते. अशा परिस्थितीत २४ तास वाहतूक नियंत्रकाची नेमणूक अत्यावश्यक आहे.

तसेच, अगाऊ आरक्षण सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना उमरगा किंवा तुळजापूरला जावे लागते, ज्यामुळे अनावश्यक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे नळदुर्ग बसस्थानकावरही आरक्षण केंद्र सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आगारप्रमुख राम शिंदे हे नळदुर्ग येथे प्रशासकीय कामानिमित्त आले होते. त्यांना निवेदन सादर करण्यात आले असता त्यांनी या मागणीचा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे योग्य तो पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन दिले.

# पवनचक्की कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर खंडणीसाठी गावगुंडांकडून तरुणास बेदम मारहाण

## धाराशिव जिल्ह्यात राबविला जातोय बीड पॅटर्न


**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.३१ जुलै -**

लोहारा तालुक्यातील धानोरी शिवारात खाजगी पवनचक्की कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर गावगुंडांनी खंडणीसाठी बेदम मारहाण करत जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. काम करायचे असेल, तर पैसे द्यावे लागतील अशी धमकी देत या गुंडांनी कर्मचाऱ्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेमुळे पवनचक्की क्षेत्रात खळबळ उडाली असून कर्मचाऱ्यांनी वाढत्या गुंडगिरीवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

याप्रकरणी विशाल विश्वनाथ पांचाळ (वय ३७, रा. कलबुर्गी, कर्नाटक) यांनी लोहारा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ते टाटा पावर रिन्युएबल एनर्जी या खाजगी कंपनीत सिव्हिल इंजिनिअर म्हणून कार्यरत असून मागील सहा महिन्यांपासून लोहारा व उमरगा तालुक्यांत पवनचक्की प्रकल्पाचे काम पाहत आहेत.

दि.३० जुलै रोजी दुपारी २ ते ३ वाजण्याच्या सुमारास नंदीपाटी ते धानोरी रस्त्यावर कंपनीचे पवनचक्कीचे पाते घेऊन जाणाऱ्या ट्रकला (क्र. जीजे-२७-टीजी-०९१५) विशाल कर्ण जमादार (कोळी) याने आपली स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच-१२-एमएल-२२४२) आडवी लावून अडवले.



ट्रक सोडत नसल्यामुळे साईट इंचार्ज संतोष निकम यांनी पांचाळ यांना घटनास्थळी पाठवले. सायंकाळी ६ ते ७ वाजण्याच्या दरम्यान पांचाळ आणि इतर कर्मचारी गाडीने घटनास्थळी जात असताना अजित मुसांडे, शंकर मुसांडे, सुरज साळुंके आणि नरहरी बाबर या चौघांनी त्यांची गाडी थांबवून कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत हाताबुक्क्यांनी मारहाण केली.

तुम्हाला काम करायचे असल्यास आम्हाला पैसे द्यावे लागतील असे म्हणत त्यांनी कर्मचाऱ्यांना दमदाटी केली. यानंतर कंपनीचे कर्मचारी शेत गट क्र. १७० व १७१, मोघा शिवारात पोहोचले असता वरीलच आरोपी तिथेही पोहोचले. याठिकाणी त्यांनी काठी आणि दगडांनी कर्मचाऱ्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात विरेंद्र महेंद्र सिंग, सुब्राशीस नाईक, श्रीकांतकुमार पानीग्रही, आणि परमेश्वर सुर्यवंशी हे गंभीर जखमी झाले.

विशेष म्हणजे आरोपींनी सुब्राशीस याचा मोबाईल फोडून टाकला व गाड्यांची काच फोडून मोठे नुकसान केले.

सध्या सर्व जखमी उमरग्यातील रुग्णालयात उपचार घेत आहेत. लोहारा पोलीस ठाण्यात अजित मुसांडे, शंकर मुसांडे, सुरज साळुंके, नरहरी बाबर आणि विशाल जमादार (कोळी) यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महादेव मुंडे प्रकरण खून प्रकरणाचा तपास एसआयटी करणार मुख्यमंत्री भावुक, कुणालाही सोडणार नसल्याचा दिला शब्द

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**

परळीच्या महादेव मुंडे यांच्या हत्येप्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या प्रकरणात कुणीही असो, त्याला सोडणार नाही असा शब्दही मुख्यमंत्र्यांनी दिला. महादेव मुडें हत्याप्रकरणी त्यांच्या पत्नी आणि कुटुंबाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. या हत्येमध्ये सहभागी असणाऱ्यांना अटक करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

परळीत दोन वर्षांपूर्वी, २१ ऑक्टोबर २०23 रोजी महादेव मुंडे यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी वाल्मिक कराड आणि त्याचा मुलगा सहभागी असल्याचा आरोप केला जात आहे. तसेच कराड गँगचे इतरही सदस्य यामध्ये असून पोलिसांनी अद्याप कुणालाही अटक केली नाही.

महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या भेटीची माहिती दिली. त्या म्हणाल्या की, महादेव मुंडे यांच्या हत्येनंतर गेल्या २१ महिन्यांचा वृत्तांत मी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घातला. हे सर्व ऐकूण मुख्यमंत्री भावुक झाले. या प्रकरणात कुणीही असले तरी त्याला सोडणार नाही असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला असल्याचं ज्ञानेश्वरी मुंडे यांनी सांगितलं.

ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या की, महादेव मुंडे हत्या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी एसआयटी नेमली आणि आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले. त्यांनी तात्काळ बीडच्या एसपींना फोन लावला आणि या प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले.

### पंकज कुमावत, साबळे करणार तपास

ज्ञानेश्वरी मुडेंनी केलेल्या मागणीनुसार पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या २१ महिन्यांपासून महादेव मुंडे प्रकरणी आरोपी खुलेआम फिरत आहेत. त्यांना अटक करण्याची जबाबदारी आता एसआयटीवर असेल.बीड येथे स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असणारे साबळे पण सध्या ते जालना येथे बदली झाली आहे.

### वाल्मिक कराडमुळे पोलिस तपास थांबला

ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या की, पोलिस प्रशासनाला परळीतील बंगल्यावरुन फोन आला आणि त्यांनी तपास थांबवला अशी माहिती आपण मुख्यमंत्र्यांना दिली. तो फोन धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावरुन वाल्मिक कराडने केला आहे. यामध्ये अजून कुणी आहे का याचा सीडीआर काढण्याची विनंती आम्ही केली. या हत्येमध्ये ज्या लोकांचा सहभाग आहे त्यांची नावे आपण मुख्यमंत्र्यांना दिली आहेत. यावर कुणालाही पाठीशी घातलं जाणार नाही, सगळ्यांना अटक करणार असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिला.

# आदित्य (दादा) पाटील यांची काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जुलै**

काँग्रेसचे युवा नेते तथा केज नगरपरिषचे माजी नगराध्यक्ष आदित्य अशोकराव पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये त्यांना मानाचे स्थान मिळाले आहे.



भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे युवा नेते आदित्य पाटील मागच्या अनेक वर्षांपासून काँग्रेसचे सक्रिय पदस्थ तथा संघटनात्मक काम करत आहेत.नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भूषवले ,उपनगराध्यक्ष पदावर दमदार काम केले. विद्यमान नगरसेवक पदावर काम करताना नगरपंचायत च्या माध्यमातून केज शहराच्या विकासात गती देण्यासाठी आदित्य पाटील यांनी योगदान दिले. आहे. त्यांचा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी सक्रियपणे सहभाग आहे.

सदभावना पदयात्रेने सामाजिक सलोखा जपला बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी विस्कटली होती.त्यावेळी आदित्य पाटील यांनी काँग्रेस माध्यमातून सदभावना मसाजोग ते बीड पदयात्रा काढली. या पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ स्वतः पदयात्रेत पायी चालले. पदयात्रेत राज्यभरातूनहजारो पदयात्री सहभागी झाले होते. सामाजिक क्षेत्रातील नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवला होता.महाराष्ट्रामध्ये यानंतर विविध ठिकाणी पदयात्रा काढण्यात आल्या. पदयात्रेच्या माध्यमातून दुभंगलेली मने जोडण्याचा दोन समाजातील तेढ दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. न्यायासाठी सरकारला धारेवर धरण्यात आले होते. काँग्रेसने काढलेल्या पदयात्रेचे राज्यभर कौतुक झाले होते

माजी मंत्री अशोकराव पाटील व खा रजनीताई पाटील यांचा राजकिय वारसा लाभलेला आहे.केवळ वारसा मिळाला म्हणून नाही तर एक अभ्यासू राजकिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गांधीवादी विचार घेऊन अत्यंत संयमाने राजकारणाबरोबर समाजकारण करणारे असा त्यांचा लौकिक आहे.नगराध्यक्ष पदावर काम करताना विकासात्मक दृष्टिकोन ठेवून यशस्वीरित्या कार्य केले आहे.

युवकांचे आयकॉन

युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष पदावर काम करताना जिल्हाभरातील युवकांना सोबत घेऊन युवक काँग्रेसचे संघटन उभा केले. कार्य निष्ठेमुळे निष्ठावान कार्यकर्ता ते युवकांचा आयकॉन बनले आहेत.सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन काम करणारे युवा नेतृत्व म्हणून ओळख आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्पर असतात. त्यांनी कधीही अडवाआडवीचे राजकारण केलेले नाही.बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक चळवळीतही आदित्य पाटील अग्रेसर राहिलेले आहेत काँग्रेस पक्ष बांधणी यामध्ये पाटील यांचे मोठे योगदान आहे या कार्याची दखल घेऊन त्यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे खासदार रजनीताई पाटील आणि माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युवक काँग्रेसमध्ये असताना मोठ्या प्रमाणावर पक्षाची संघटनात्मक बांधणी केलेली आहे. सदर कार्याची दखल घेऊन काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली. यापुढील काळामध्ये काँग्रेस पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आले निवडीबद्दल शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# प.पू.गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे महाविद्यालयात चरक जयंती उत्साहात साजरी

**चरक जयंतीतून आयुर्वेदाची नवी प्रेरणा**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ जुलै**





प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्राचे जनक आयुर्वेदाचार्य आचार्य चरक ऋषी यांची ख्याती आयुर्वेदात आज सर्वजन जाणतात. त्यांनी संपूर्ण भारतवर्षाला आयुर्वेदावर आधारित अतिशय महत्व पूर्ण ग्रंथ लिहिला आज सगळीकडे तो चरक संहिता या नावाने प्रसिद्ध आहे. त्यांचे आयुर्वेदातील महत्वपूर्ण योगदान विशद करण्यासाठी परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे महाविद्यालयातील विद्यार्थी, आचार्यगण, प्राध्यापक वर्ग यांनी चरक जयंतीचे आयोजन केले होते. महाविद्यालयाच्या वतीने आचार्य चरक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. ही जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्यात आयुर्वेदातील तज्ञ अनुभवी प्रतिष्ठित डॉक्टरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना आचार्य चरक यांच्या आयुष्याचा व त्यांच्या वैद्यकशास्त्रातील अमूल्य योगदानाचा आढावा देत प्रेरणादायी प्रबोधन केले व विद्यार्थ्यांना भारतीय वैद्यकीय इतिहासाबद्दल जागरूक राहून नवे संशोधन करण्याचे आवाहन करण्यात आले या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी चरक संहितेतील महत्त्वपूर्ण सूत्रांचे पठण केले आणि आयुर्वेदाची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प घेतला.

# भाजपाची परळी शहर कार्यकारिणी जाहीर

### सहा उपाध्यक्ष, तीन सरचिटणीस तर पाच सरचिटणीस आणि विविध आघाडीचे अध्यक्ष घोषित

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ जुलै**

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या सूचनेवरून भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी शहर कार्यकारिणी जाहीर केली आहे. जुन्या– नव्यांना प्राधान्य देत सर्व घटकांना जोडणारी ही कारयकारिणी असुन सहा उपाध्यक्ष, तीन सरचिटणीस तर पाच चिटणीसांची निवड करण्यात आली आहे. विविध आघाड्यांचे अध्यक्षही यावेळी घोषित करण्यात आले.

भाजपाच्या शहराध्यक्षपदी सौ उमाताई सन शेट्टी यांची काही दिवसांपूर्वीच निवड झाली आहे. त्यानंतर उर्वरित कार्यकारणीकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच आज राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या सूचनेवरून भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी शहर कार्यकारिणी जाहीर केली असुन त्यात उपाध्यक्ष म्हणुन विजयकुमार वाकेकर, महादेव ईटके, प्रा. पवन मुंडे, प्रशांत कराड, सौ. चंदाताई ठोंबरे, सौ. वर्षाताई जोशी यांची निवड करण्यात आली आहे. सरचिटणीस म्हणून संदिप लाहोटी, अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला यांची वर्णी लागली आहे. चिटणीसपदी अश्विन आघाव, वैजनाथ रेकने, अमोल डुबे, जितेंद्र मस्के, अनिस शेख चिटणीस हे तर कोषाध्यक्षपदी अनिष अग्रवाल यांची नियुक्ती केली आहे.

भाजपाच्या विविध आघाडीचे अध्यक्षही जाहीर करण्यात आले असून महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी श्रीमती सुचिता पोखरकर, युवा मोर्चाच्या शहराध्यक्षपदी सुशिल हरंगुळे यांची अल्पसंख्याक मोर्चाच्या अध्यक्षपदी शेख शमी यांची दलित आघाडीच्या अध्यक्षपदी राहुल घोबाळे तर ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदपदी विजय दहिवाळ यांची निवड करण्यात आली आहे.नव्या जुन्यांना संधी देत आणि सर्व सामाजिक घटकांना कार्यकारणी मध्ये प्राधान्य देत शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी सर्वव्यापक आणि सर्वांना न्याय देणारी कार्यकारणी जाहीर केली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# श्री नागेश्वर मंदिर येथे नागपंचमी निमित्त दर्शनासाठी भाविकांची गर्दी ; मंदिर परिसरात हर हर महादेवचा जयघोष

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ जुलै**

परळी शहरापासून जवळच असलेल्या धर्मापुरी रोड जवळील, सिमेंट कंपनी व रेल्वे गेट जवळील प्रसिद्ध असलेले श्री नागेश्वर मंदिरात नागपंचमी निमित्त मंगळवार दि. २९ जुलै रोजी पहाटे पासून भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. श्री नागेश्वर मंदिरात हर हर महादेव, नागेश्वर भगवान की असा जयघोष करत भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. यावेळी आलेल्या भाविकांसाठी प्रसादाची करण्यात आली होती.

२५ जुलै पासून श्रावण महिन्याच्या पावन पर्वाला सुरुवात झाली असून पहिला सोमवार तसेच नागपंचमी निमित्त श्री नागेश्वर मंदिरात पहाटेपासून महिला, पुरुष भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. भविकांनी बिल्व फळ, बेल, विविध प्रकारचे फुले भाविकांनी श्री नागेश्वरांच्या पिडीवर वाहिले व दर्शन घेतलं. श्री नागेश्वर मंदिर पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. सकाळी अभिषेक व पुजा करण्यात आली. यावेळी हर हर महादेव, बम बम भोले चा गजराने मंदिर परिसर फुलून गेले होते. श्रावण महिन्यात दररोज भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.दरम्यान दर्शनासाठी आलेल्या भविकांसाठी खिडकी व मोतीचूर लाडूचे वाटप करण्यात आले. नागपंचमी निमित्त दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती अशी माहिती संजय (बंडू) जाधव, रवी जाधव, पांडुरंग पानखडे, महादू हाके बाळू ड्रायव्हर यांनी दिली.



# भागूजीराव ढेकळे विद्यालयात स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांचा स्मृतिदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३१ जुलै**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात कर्मयोगी स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांचा स्मृतिदिन बुधवार दि.३० रोजी साजरा करण्यात आला.

यावेळी प्रथम नानांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए.एस. यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. अरुण कळासे , पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी नानांच्या कार्यावरती प्रकाश टाकला. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# १ ऑगस्ट : इतिहास , संस्कृती आणि स्वाभिमान यांचा संगम अण्णाभाऊ साठे यांची जयंती : एक स्मरण आणि महसूल दिन

इतिहासात काही दिवस असे असतात की ज्यांचे महत्त्व एखाद्या घटनेपुरते मर्यादित राहत नाही , तर ते संपूर्ण विचारप्रवाह , चळवळ आणि समाजमनाचे प्रतिबिंब बनतात . १ ऑगस्ट हा तसा दिवस ! एका क्रांतिकारक साहित्यिकाचा जन्मदिवस , शासकीय यंत्रणेतील एक अत्यंत महत्वाचा विभागाचा गौरवदिन आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा निर्णायक टप्पा . या एका तारखेत तीन वेगळ्या वाटा आपापल्या दिशेने सुरू झालेल्या असूनही , त्या सर्वांचा अंतिम उद्देश एकच आहे – सामान्य माणसाचं जीवन अधिक न्याय्य , स्वाभिमानी आणि सन्मानित करण .

लेखणीतून उठलेला आवाज : अण्णाभाऊ साठे

१९२० च्या याच दिवशी , पुण्याच्या वद्रू बुद्रुक गावात एका वंचित कुटुंबात जन्म झाला , एका अशा व्यक्तीचा , ज्याने पुढे भारतीय साहित्यविश्वाला एक नवा मार्ग दाखवला . अण्णाभाऊ साठे – एक व्यक्ती नव्हे , तर चळवळ होती . शिक्षणाच्या संधीपासून वंचित , पण वास्तवाच्या भाषेत लिहिणारी त्यांची लेखणी ही लाखो श्रमिक , दलित आणि वंचितांच्या वेदनांची समर्थ साक्ष होती . अनुभवाच्या विद्यापीठातून शिकलेल्या अण्णाभाऊंनी लेखणी हातात घेतली आणि एक समाजजागृतीचा वणवा पेटवला . त्यांच्या कादंबऱ्या , कथा , तमाशे – हे सर्व केवळ कलाकृती नव्हत्या , तर त्या काळातील व्यवस्थेवर केलेले तीव्र भाष्य होते .

' फकीरा ' या त्यांच्या अजरामर कादंबरीतून ज्या बंडखोरतेचा आवाज उमटतो , तो केवळ साहित्यात नव्हे तर समाजमनातही गाजतो . अण्णाभाऊंचा विद्रोह ही अराजकतेची हाक नव्हती , तर तो एका समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी होता . त्यांनी लोककलेसारख्या तमाशाला केवळ करमणुकीपुरते मर्यादित न ठेवता , ते समाजजागृतीचं शस्त्र बनवलं . त्यांच्या लेखणीचा प्रवास हा माणसाच्या आत्मसन्मानाचा प्रवास ठरतो – तो आजही अपूर्ण आहे , पण सुरु आहे . अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त , त्यांच्या विचारांची ही ज्योत नव्या पिढीपर्यंत पोचवण्याचे आपले कर्तव्य आहे .

महसूल सेवा : शासन आणि जनतेमधील नात्याचा पूल

अण्णाभाऊंच्या जयंतीच्या दिवशीच महसूल दिन साजरा होतो . पहिल्या दृष्टीक्षेपात ही शासकीय कार्यक्रमाची चौकट वाटू शकते . पण जर आपण थोडं खोलात पाहिल , तर महसूल विभाग म्हणजे शासनाची एक अशी रचना आहे जी सर्वसामान्य नागरिकाच्या सर्वात जवळ उभी आहे .. प्रशासनातील महसूल विभाग म्हणजे ग्रामीण भारताच्या मूलभूत प्रश्नांशी झगडणारा आणि ते सुटावेत म्हणून सतत झटणारा विभाग .

गावातील शेतकरी जर आपल्या सातबाऱ्याच्या उताऱ्यावर विश्वास ठेवतो , तर तो महसूल यंत्रणेवर ठेवलेला विश्वास असतो . नकाशे , फेरफार , खरेदी–विक्री , जमिनीचे हक्क , नोंदणी , आपत्तीमूल्यांकन – या सर्व प्रक्रियांच्या मागे महसूल कर्मचाऱ्यांची मेहनत असते . आणि ही मेहनत ही केवळ फाईल आणि सहीपुरती मर्यादित नसते . एखाद्या नैसर्गिक आपत्तीमध्ये गाव जलमय झालं की पावसात , चिखलात , पहिल्यांदा पोहोचणारा तलाठी असतो . नुकसानमापन करणारा मंडळ अधिकारी असतो . संकटात जनतेसाठी धावणारा तहसीलदार असतो . ही लोक फक्त सरकारी कर्मचारी नाहीत – ते संकटात तुमचे पहिले आधारस्तंभ असतात .

या विभागाची परंपराही जुनी आहे . ब्रिटिश कालखंडात सुरुवात झालेली ही यंत्रणा , स्वातंत्र्यानंतर अधिक जनाभिमुख झाली . अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महसूल व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि प्रभावी झालं आहे – डिजिटल सातबारा , ऑनलाईन फेरफार नोंदणी , भूमी अभिलेख संगणकीकरण ... हे सगळं आज गावातील सामान्य माणसालाही स्पर्श करू लागलं आहे .

महसूल दिन म्हणजे केवळ प्रशासकीय कार्यालयाचा उत्सव नव्हे – तर शासन आणि जनतेतील नातं दृढ करणाऱ्या कामगिरीचं स्मरण आहे.

असहकार चळवळ : स्वराज्याच्या स्वाभिमानी बीजांची पेरणी

१९२० सालीच , १ ऑगस्ट रोजीच , महात्मा गांधींनी असहकार चळवळीची सुरुवात केली . ही चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक टप्पा नव्हता – ती एक मूल्यनिष्ठ चळवळ होती . त्यावेळी जालियनवाला बागचा अत्याचार , रौलट कायद्याचा अन्याय , ब्रिटिशांच्या सत्तेचा अंधेर – या सर्वाचा रोष भारतीय जनतेत खदखदत होता . गांधीजींनी याच जनभावनेला शांततामय मार्ग दिला . त्यांनी विदेशी वस्त्रांवर बहिष्कार टाकायला सांगितल , सरकारी शिक्षण संस्था , न्यायालय यांचा त्याग करायला सांगितला . स्वदेशी ही केवळ आर्थिक संकल्पना नव्हती , ती मानसिक गुलामीपासून मुक्त होण्याची घोषणा होती . संपूर्ण देशभर असहकाराची लाट पसरली . ग्रामीण भारतात शेतकरी जागा झाला , शहरी भारतात विद्यार्थी आणि वकील रस्त्यावर उतरले . महिलांनीही यात मोठ्या प्रमाणात भाग घेतला . ही चळवळ हळूहळू स्वराज्य या संकल्पनेचं बिंब बनली . आजप, शतक उलटून गेले तरी असहकार चळवळीचा संदेश कालबाह्य झालेला नाही . अन्यायाविरुद्ध उभं राहण , तेही अहिंसेच्या मार्गाने – ही कल्पना आजही आपल्याला वाट दाखवते . संविधानिक मार्गाने लढण , जनतेचा जबाबदार सहभाग , लोकशाही मूल्यांचं रक्षण – या गोष्टी फक्त घोषवाक्य म्हणून नव्हे , तर कृतीत उतराव्यात लागतात .

१ ऑगस्ट हा दिवस आपल्याला तीन वेगवेगळ्या वाटांनी एकच गोष्ट सांगतो – सामान्य माणूसच खरा नायक आहे अण्णाभाऊ साठे यांची साहित्यिक क्रांती , महसूल अधिकाऱ्यांची नि:स्वार्थ सेवा आणि गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलनातील जनतेचा सहभाग – हे सर्व त्या सामान्य माणसाच्याच स्वाभिमानाचे विविध रूप आहेत . या तीन घटनांचा एकत्रित अर्थ असा की , देशाच्या उभारणीसाठी केवळ लढणं पुरेस नाही , तर समाजाला समजून घेणं आणि सक्षम करणंही तितकच आवश्यक आहे .

आपण या दिवशी कोणत्याही एका घटनेकडे पाहून उत्सव साजरे करू शकतो . पण जर आपण या तिन्ही घटनांकडे एकत्र पाहिल , तर आपल्याला एक मोठ चित्र दिसतं – सामान्य माणसाच्या अधिकारांच , संधींच आणि न्यायाच ! हे दिवस केवळ स्मरणाचे नसावेत ; ते प्रेरणेचे , आत्मपरीक्षणाचे आणि कृतीचे असावेत.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,**
**तहसीलदार,**
**बीड**

# कामधेनु केअर सेंटरचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जुलै**



वयाच्या साठी नंतर भविष्याची खरी काळजी सुरू होते, कुटुंबातील संख्या कमी होत असल्याने ज्येष्ठ व्यक्तींना आपल्याला कोण सांभाळेन? याची चिंता पडलेली असते, ही चिंता निराकरण करणारी ही कामधेनु केअर सेंटरची सेवा आज सुरू झाली ही आजच्या काळात महत्त्वाची आणि गरजेची सेवा असल्याचे मत ह.भ.प. रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

पूर्वी प्रत्येक घरी गाय असायची, आज गोशाळेतून सांभाळ होत आहे हा विकल्प आहे. वृद्धांची सेवा घरातच असायला पाहिजेत पण आजच्या काळात ते शक्य होत नाही. सेवेमुळे आयुष्य, विद्या, यश, धन लाभत असते ही महत्त्वाची आणि गरजेची सेवा कामधेनु परिवाराकडून होत आहे.' केअर 'घेण्याची इच्छा मनात असते पण कुटुंबात तशी परिस्थिती नसते, त्याला हा पर्याय म्हणून कामधेनु केअर सेंटरच्या सेवेची सुरुवात झाली आहे. आयुर्वेद, वैद्यकीय शिक्षण आणि सेवा प्रकल्पात प्रत्यक्ष सोबत काम केलेले डॉ आनंत मुळे आणि श्रीगुरु संजय महाराज पाचपोर यांच्यासह विनायक महाराज पाटागंणकर, डॉ .अमोल गिते, वैद्य गणेश चरखा, वैद्य शिवप्रसाद चरखा, डॉ.अनुराग पांगरीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

पेशंटला दिलासा मिळून लवकर बरा होण्यासाठीचा हा नावीन्यपूर्ण प्रयोग प्रथमच बीड शहरात सुरू झाला, ही महत्त्वाची सुश्रुषा वैद्यकीय क्षेत्रासाठी आहे, असे मत डॉ.अनंत मुळे यांनी व्यक्त केले तर पुणे मुंबई सारख्या मोठ्या शहरात ज्येष्ठांचा सांभाळ त्यांची सुरक्षा करणारा अभ्यासक्रम आणि सेवा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरतात, वैद्यकीय उपचार आपापल्या डॉक्टर कडे घेता येतील पण हॉस्पिटल नंतरची सुश्रुषासाठीची सोय बीड शहरात पण गरजेची होती, ती कामधेनुच्या या केअर सेंटर मुळे भागणार आहे आणि जेष्ठांना आधार, दिलासा मिळणार आहे असे मत डॉ.अनुराग पांगरीकर यांनी यावेळी मनोगत आतून व्यक्त केले. डॉ अरविंद श्रीनिवास कुलकर्णी, सौ मंजुषा, सौ. गार्गी सुमित कुलकर्णी यांनी कामधेनु परिवाराच्या वतीने सर्वांचे येथोचित स्वागत, सत्कार ,पूजन केले.

# महसूल सप्ताहात जिल्ह्यात विविध नाविण्यपूर्ण उपक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३१ जुलै -**

जिल्ह्यात महसूल विभागामार्फत १ ऑगस्ट २०२५ रोजी 'महसूल दिन आणि १ ते ७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत 'महसूल सप्ताह-२०२५' साजरा करण्यात येणार आहे. महसूल सप्ताहात नांदेड जिल्ह्यात विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील नागरिकांनी यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

महसूल दिन व महसूल सप्ताहात विशेष उपक्रम राबविण्याबाबत आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या. यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे तर प्रत्यक्ष अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, तहसिलदार विपीन पाटील, शंकर लाड आदीची उपस्थिती होती.

या सप्ताहात प्रत्येक दिवशी तहसिल कार्यालयामार्फत समाजाच्या विविध घटकांतील नागरिकांसाठी विशेष मोहिम, कार्यक्रम, उपक्रम, शिबीरे, महसूल अदातलीचे आयोजन करण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्यासह सर्व महसूल अधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे दिल्या. महसूल सप्ताहात नांदेड जिल्ह्यात विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार असून यात १५६ गावांत गाव तीथे स्मशानभूमी उभारण्यात येणार आहे. एम-सँड' धोरणाची अंमलबजावणी, गावातील जे मोठे रस्ते अतिक्रमण मुक्त झाले आहेत तिथे दुतर्फा वृक्षारोपण करणार, ४ ऑगस्टपासून ऑनलाईन सुनावनीस प्रारंभ. भूसंपादनाचे सॉफ्टवेअर सुरु करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून या कामाला पुर्णत्वाकडे नेणार. महसूल विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तके अद्ययावत करण्याचे नियोजन केले असल्याचे माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने दिली आहे.

**महसूल सप्ताहातील कार्यक्रमांचे स्वरुप**

शुक्रवार १ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. या दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन केले आहे.

शनिवार २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्यात येईल. रविवार ३ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे. सोमवार ४ ऑगस्ट रोजी प्रत्येक मंडळनिहाय 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' राबविण्यात येईल. मंगळवार ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील ज्या लाभार्थ्यांचे थेट लाभ हस्तांतरण झालेले नाही, त्यांना घरभेटी देऊन डीबीटीद्वारे अनुदानाचे वाटप केले जाईल. बुधवार ६ ऑगस्टला शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करून त्या अतिक्रमणमुक्त केल्या जातील. तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेतले जातील. गुरुवार ७ ऑगस्टला एम सँड धोरणाची अंमलबजावणी करून नवीन मानक कार्यप्रणालीनुसार धोरण पूर्णत्वास नेले जाईल आणि 'महसूल सप्ताहाचा' सांगता समारंभ आयोजित केला जाईल. या महसूल सप्ताहात नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी आपला उस्फुर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेडमध्ये उद्या कवी संमेलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३१ जुलै -**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या दिनांक २ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता शंकराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे महाराष्ट्रातील नामांकित कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती कवी संमेलनाचे आयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची विशेष उपस्थिती राहणार असून कार्यक्रमाचे उद्घाटन सत्कारमूर्ती आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर करणार असल्याची माहितीही पावडे यांनी दिली आहे.



आपल्या कार्यकर्तृत्वाने आणि लोकसंपर्कामुळे नांदेड जिल्ह्यातील लोकनेते म्हणून सुपरिचित असणाऱ्या आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस याही वर्षी विविध उपक्रमांनी साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे यांच्या पुढाकारातून यावर्षी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात दिनांक २ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्रातील नामांकित कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे.

यावेळी सत्कारमूर्ती आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उपस्थिती राहणार आहे तर याच वेळी नामदार हेमंत पाटील , आमदार राजू नवघरे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. आमदार आनंदराव बोंढारकर , आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्यासह माजी आमदार मोहन हंबर्डे , राष्ट्रवादीचे महानगर अध्यक्ष माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा , माजी आमदार अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर , जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर , प्रवीण पाटील चिखलीकर, प्रणिता ताई देवरे चिखलीकर ,राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर , प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी , राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग सेलचे प्रदेशाध्यक्ष रामदास सुमठाणकर , सचिव सुनील नानवटे , सुनंदा जोगदंड , तेजस्विनी पाटील , सुरेखा पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक युवती चे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत

कवी संमेलनात छत्रपती संभाजी नगरचे नारायण पुरी , छत्रपती संभाजीनगरचे निलेश चव्हाण, इगतपुरीचे तुकाराम धांडे , अंबाजोगाईचे मुकुंद राजपंखे , अकोल्याचे किशोर बळी , माजलगावचे प्रभाकर साळेगावकर , जालनाच्या संजीवनी तडेगावकर , अहमदपूरचे राजेसाहेब कदम , परभणीचे केशव खटींग, नांदेडचे , श्रीनिवास मस्के, शंकर राठोड , रोहिणी पांडे हे कवी आपल्या कसदार कविता सादर करणार आहेत . भर पावसाळ्यात श्रावण मासात आता कवींच्या काव्यांच्या धारा नांदेडकरांना चिंब करणार आहेत. त्यामुळे आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलनाचा आस्वाद घेण्यासाठी नांदेडच्या रसिक माय बापानी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक माधव पावडे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेताजी भोसले, पप्पू जाधव, साहेबराव धनगे , संतोष पावडे, विलास सूर्यवंशी, बालाजी शिंदे , योगेश शिंदे, अभिजीत भालके, सुनील पावडे , चंद्रकांत भोसले, मारुतराव डांगे, बालाजी पावडे, शाहरुख खान, बजरंग रासे , शेख मुजीब आणि यांच्यासह अनेक जण परिश्रम घेत आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### गाडी पार्किंगच्या कारणावरून लॉजवर आलेल्या ग्राहकाची दुकानदारास मारहाण

**माहूर** -माहूर बस स्थानकासमोरील राधिका लॉज मध्ये आलेल्या एका ग्राहकाला बाजूच्या दुकानदाराने माझ्या दुकानासमोर लावलेली गाडी काढून घ्या,असे म्हणले असता शिवीगाळ करून जबर मारहाण केल्याची विचित्र आणि खळबळजनक घटना दि.३१ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली असून,लॉज मालकासह पॅसेंजर विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेतील फिर्यादी दिलीप जयस्वाल हे बस स्थानका समोरील जयस्वाल कॉम्प्लेक्स येथे बीएसएनएल कंपनीचे सिमकार्ड फ्रेन्चाईजी चालवुन कुटुंबाचे उदर्निवाह भागवितात. त्यांनी माहूर पोलीस ठाण्यात समक्ष हजर होऊन दिलेल्या फिर्यादीप्रमाणे दि.३१/०७/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा.चे सुमारास मी माझे ओम मोबाईल मॅजिक दुकान उघडत असतांना माझे दुकानासमोर चार चाकी पार्किंग केलेली दिसली असता मी राधिका लॉज व हॉटेलचे मालक प्रभु मेहता यांना मी माझे दुकान उघडत आहे दुकानासमोर लावलेली चार चाकी गाडी क्र.चक-०४-FR-०४५७ काढुन घ्या,असे सांगितले असता प्रभु मेहता यांचे लॉजवर थांबलेला वैभव भगवान पठाडे राहणार पुसद यांनी त्यांची गाडी काढुन घेतली व मी दुकानात असतांना माझ्याकडे येवुन मला शिवीगाळ करुन धक्काबुकी केली व माझ्या तोंडावर हाताने मारहाण करु लागला असता तेव्हा माझ्या दुकाना शेजारी राहणारे शेख सद्दाम शेख जब्बार वय ३३ वर्षे,जावेद खान अजीज खान पठाण वय ५० वर्षे दोघे रा. माहुर यांनी सदर भांडने सोडवा सोडवी केली. नंतर तुला बघुन घेतो असे, बोलुन वैभव भगवान पठाडे हा तेथुन निघुन गेला. भांडणामध्ये दुकानातील साहित्याची तोडफोड त्याने केली आहे. तसेच मी वारंवार राधिका लॉज व हॉटेलचे मालक प्रभु मेहता यांना माझ्या दुकानासमोर त्यांचे लॉजवर येणारे ग्राहकांचे वाहने पार्किंग करु नका असे सांगितले असता ते याकडे दुर्लक्ष करीत असुन आज रोजी मला त्यांनी माझे ग्राहक इथेच गाड्या लावतील असे म्हणुन शिवीगाळ केली आहे. त्यामुळे राधिका लॉज मध्ये आलेले पॅसेंजर वैभव भगवान पठाडे वय ३० वर्ष व्यवसाय चालक रा.साई विहार कवडीपुर, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ व राधिका लॉज व हॉटेलचे मालक प्रभु मेहता रा.माहुर या दोघांविरूध्द कायदेशिर कार्यवाही करावी, अशी फिर्याद दिलीप जयस्वाल यांनी दिल्याने माहूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप अन्येबोईनवाड आणि पोलीस करत आहेत.

### माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त हदगाव येथे वृक्ष लागवड


**हदगाव-** महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा आर्य वैश्य समाज भुषण आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त हदगाव येथील हुतात्मा स्मारक परिसरात आज वृक्ष लागवड व संगोपन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम आर्य वैश्य महासभा व आर्य वैश्य समाज यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.



सदर कार्यक्रमात समाज बांधवांनी एकत्र येत पर्यावरण रक्षणाचा संदेश देत विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण केले. या उपक्रमात नांदेड जिल्हा आर्य वैश्य महासभेचे ग्रामीण अध्यक्ष प्रभाकर पत्तेवार, महासभेचे सल्लागार डॉक्टर संजय पलीकोंडावर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुनील व्यवहारे, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे सदस्य शिरीष मनाठकर ,माजी सदस्य राजेश्वर रायवार , समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास दमकोंडवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे पर्यावरणाचा समतोल राखणे, हरित क्षेत्र वाढवणे व भावी पिढीसाठी स्वच्छ आणि निरोगी वातावरण तयार करणे हे होय. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समाज भुषण आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या समाजहितासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या. हदगाव स्मशानभूमी मध्ये १५० हून अधिक वृक्षांरोपन केले एवढेच संगोपन सुद्धा केले म्हणून समाज बांधव डॉ संतोष मामीडवार व सुरेश तृप्तेवार यांचा महासभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त पेढे वाटून वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विलास व्यवहारे ,बंडोपंत रायवार, अरुण मामीडवार, महेश तुप्तेवार, राम वट्टमवार ,सतीश रेवनवार, डॉक्टर गोकुळ चक्करवार ,गजानन रेवनवार ,सुरेश तुप्तेवार ,सुनील रायवार आदींची उपस्थिती होती अल्पोपहार व चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### संजय कानवटे प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड**-महात्मा गांधी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय हरिबा कानवटे हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दिनांक ३१ जूलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महात्मा गांधी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कानवटे हे दिनांक १९ जून १९९१ रोजी शिक्षक म्हणून रुजू झाले होते. आज दिनांक ३१ जुलै२०२५ रोजी नियतवयोमानाने दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.



पुढील आयुष्य निरोगी व सुखी समाधानाच जावो अशा शुभेच्छा संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब जाधव यांनी दिल्या. तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संजय कानवटे यांचा सेवापुर्ति सोहळा निमित्त स्वागत करून पुढील आयुष्यास निरोगी राहण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महात्मा गांधी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# महसूल सप्ताहाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा : तहसीलदार मुगाजी काकडे

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.३१ जुलै -**



१ ते ७ ऑगस्ट राज्यात विशेष महसूल सप्ताह महसूल विभाग लोकाभिमुख व्हावा व जनतेची जनतेची महसूल विभागाशी निगडित सर्व कामे सुरळीतपणे व्हावी याकरिता एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट यादरम्यान विशेष महसूल सप्ताह साजरा करण्याचे शासनाचे आदेश असून,या सप्ताहात राबविण्यात येणारे उपक्रमाचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. याच अनुषंगाने माहूर तहसील कार्यालयात १ ते ७ ऑगस्ट दरम्यान विशेष महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, आज शुक्रवार १ ऑगस्ट रोजी महसूल दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महसूल सप्ताहाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार मुगाजी काकडे यांनी केले आहे.

महसूलविभागानेजिल्हास्तरीय महसूली कामे वेळच्यावेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, वसुलीच्या नोटीसी पाठविणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांची चौकशी करणे इ. कामे वेळेच्यावेळी व वेळापत्रकानुसार करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा व महसूल वसुलीचे उदिष्ट पार करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याकरीता तसेच महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरीता दरवर्षीप्रमाणे दि.१ ऑगस्ट, २०२५ हा महसूल दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा. तसेच, यावर्षी महसूल दिनापासून दि. १ ते ७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत राज्यभरात विशेष महसूल सप्ताह साजरा करण्यात यावा ,असे शासनाचे आदेश असल्याने माहूरच्या तहसील कार्यालयात महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.


१ ते ७ ऑगस्टः राज्यात विशेष महसूल सप्ताहामध्ये राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे..

१ ऑगस्ट-'महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ,महसूल संवर्गातील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार्। प्रमाणपत्र वितरण समारंभ वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ,२-ऑगस्ट 'शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम,३ ऑगस्ट -'पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे,४ ऑगस्ट-छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे, ५ ऑगस्ट-विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे,६ ऑगस्ट-'शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेणे,७ ऑगस्ट- एम सँड धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे (एसओपी प्रमाणे) धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ.अशाप्रकारे १ ते ७ ऑगस्ट दरम्यान माहूर तालुक्यात महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार मुगाजी काकडे यांनी केले आहे.

# दत्ताहारी मेहत्रे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि.३१ जुलै -**


नायगाव तालुक्यातील डोंगरगाव येथील रहिवासी दत्ताहारी मारोती पाटील मेहत्रे वय ४५ वर्ष यांच दि. ३१ जुलै २०२५ रोजी गुरुवारी पहाटे पुणे येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे.



दत्ताहारी मेहत्रे यांच्या पार्थिवावर दि. ३१ जुलै रोजी गुरुवारी दुपारी ३ वाजता डोंगरगाव ता. नायगाव जि.नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई , वडील, पत्नी , चार मुली, दोन बहिणी , एक भाउ, असा मोठा परिवार आहे.

# सामाजिक बांधिलकी जपणारे दानशूर व्यक्तिमत्व संतोष कुलकर्णी

बिलोली शहरातील व तालुक्यातील सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे व आपल्या सामाजिक कार्यातून संपूर्ण जिल्ह्यात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे नेतृत्व म्हणजे संतोष कुलकर्णी.आज या दिलखुलास, दिलदार, दानशूर व्यक्तिमत्वाचा वाढदिवस त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याव्यक्तिमत्वावर मला त्यांच्या बदल लिहिण्याचा मोह आवरला नाही.



संतोष कुलकर्णी यांनी कमी वयातच आपली वेगळी ओळख निर्माण केली असून सन २००७ पासून त्यांनी बिलोली शहराच्या राजकारणाला हळू हळू सुरुवात केली. बिलोली शहरातील पत्नी -पत्नी नगराध्यक्ष होण्याचा बहुमान संतोष कुलकर्णी व त्यांच्या पत्नी सौ. मैथिली संतोष कुलकर्णी यांना मिळाला आहे. स्वतः चा समाज अल्प असला तरी संतोष कुलकर्णी यांना सर्व जाती धर्माचा पाठबळ मिळालं हे विशेष. सर्व जाती धर्माच्या पाठबळावर त्यांनी थेट जनतेतून निवडणूक लढवीत नगराध्यक्षपद मिळवील. त्यांनी शहर विकासचे अनेक विकास कामे केली असून नूतन नगर पालिकेसाठी जागा हस्तातरित करून नगर पालिकेची नवीन इमारत, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, वाचनालय, रस्ते, नाली, पाणी पुरवठा, अतिक्रमित गायरान जागेचा प्रश्न,दिवाबती, व नागरिकांच्या मूलभूत गरजा यासारखे अनेक कामे केली आहेत. सर्वधार्मियांच्या धार्मिक सण उत्सवात ते स्वतः सहभागी असतात. गोरगरीब कुटुंबियांना लग्नासाठी, उपचारासाठी वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत,गोरगरीब गरजूना आर्थिक मदत, यासारखे सामाजिक कार्य त्यांच्या हातून सतत होत असते.गणेश उत्सव, दुर्गा उत्सव, उर्स, संदल, अनेक महापुरुषांच्या जयंतीत ते सामाजिक बांधिलकी जपत सहभागी होतात. त्यामुळे आज सर्व जाती धर्मातील नागरिक त्यांच्या सोबत जोडल्या जात आहेत.कोरोनाच्या काळातही त्यांनी गोर गरीब गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तू, व अन्नदान सारखे सामाजिक उपक्रम राबवित अनेकांना मदत केली. जरी ते राजकारणात सक्रिय असले तरी सर्व जनता त्यांच्या सामाजिक व धार्मिक कार्यामुळे आजघडीला त्यांच्या सोबत दिसत आहे. त्यामुळे त्यांच्या बदल जनसामान्य गोरगरीब जनता व त्यांच्या हितचिंतकामध्ये संतोष दिसत आहे. तर त्यांच्या लोकप्रियते मुळे विरोधकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सर्वांच्या अडी अडचणीच्या काळात ते कामाला पडत असल्याने कुलकर्णी यांची लोकप्रियता दिवासोंदिवस वाढत आहे. त्यांचे सर्व राजकीय व्यक्ती सोबत चांगले हितसंबंध असल्याने जनतेचे कामे व विकास कामे करण्यास कांहीही अडचण येत नाही. अशा सर्व जाती धर्मास सोबत घेऊन चालणाऱ्या व राजकारणात असूनही सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तिमत्वास वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**कुडके गंगाधर, बिलोली**

# आ. केरामांच्या नेतृत्वावर विकासाची छाप; युवावर्गाचा वाढता विश्वास, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही तयारीचे संकेत

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.३१ जुलै -**

माहूर-किनवट विधानसभा मतदारसंघात गेल्या सहा वर्षांपासून आमदार भिमराव केराम यांनी केलेल्या भरीव कामगिरीमुळे त्यांच्या नेतृत्वाची स्पष्ट छाप मतदारसंघावर उमटलेली दिसून येत आहे. विकासाभिमुख दृष्टिकोन, सर्वसमावेशक कार्यशैली आणि जनतेशी असलेला थेट संवाद यामुळेच वर्ष २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत भाजपाच्या बालेकिल्ल्यात आपली ठाम उपस्थिती सिद्ध केली.





या विजयानंतर मतदारसंघात नवचैतन्य निर्माण झाले असून विशेषतः तरुणाई मोठ्या प्रमाणावर आ. केराम यांच्या नेतृत्वाकडे आकर्षित होत आहे. या नेतृत्वातील विश्वासार्हतेमुळेच नुकताच तालुक्यातील एक प्रभावी व प्रतिष्ठित राजकीय गट भाजपात प्रवेश करताना आ. भिमराव केराम यांच्याच नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांच्यासोबत यापुढील राजकारण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यातूनच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकांमध्ये देखील आ. केराम यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा विस्तार करण्याचा मनोदय विविध राजकीय इच्छुकांमध्ये दिसून येत आहे. मतदारसंघातील विकासकामांची दिशा, कार्यपद्धतीतील पारदर्शकता आणि लोकसंपर्काची प्रामाणिकता ही त्यांच्या नेतृत्वाची बलस्थाने ठरत आहेत.

याशिवाय, युवा नेते ॲड. प्रतिक केराम यांच्या संघटनात्मक योगदानामुळे पक्ष संघटनेला अधिक बळकटी मिळत असून तरुण कार्यकर्त्यांमध्ये नव्या जोमाने उत्साह संचारलेला आहे. तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून नव्या युवा कार्यकर्त्यांचा ओघ पक्षाकडे वळताना दिसतो आहे, आणि यामध्ये प्रतिकभाऊ केराम यांच्या संघटनशक्तीचा मोठा वाटा आहे.

एकूणच, आ. भिमराव केराम यांच्या सहा वर्षांच्या कामगिरीवर लोकांनी पुन्हा विश्वास दाखवण्यास सुरुवात केली असून, त्यांच्या नेतृत्वात विकास आणि राजकीय स्थैर्य यांचा ठोस अनुभव मतदारसंघातील जनतेला येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही हाच अनुभव पक्षाला यशाच्या दिशेने घेऊन जाणार, अशी प्रतिक्रिया स्थानिक राजकीय वर्तुळात उमटत आहे.

# शेतकरी सामन्यांचे नेतृत्व ; आ. आनंदराव बोंढारकर

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात जेव्हा सामान्य जनतेच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या हितासाठी झगडणाऱ्या नेतृत्वाचा विचार केला जातो, तेव्हा सर्वप्रथम नाव घेतले जाते शिवसेना पक्षाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांचे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या कार्याचा आढावा घेणे, त्यांच्या नेतृत्वाची दिशा व ध्येय समजून घेऊया...

शिवसेनेच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील राजकारणात पाय ठेवलेल्या आनंदराव बोंढारकर या तरण्याबांड तरुणाने आपल्या कार्यकर्तुत्वांनी आणि प्रामाणिकपणामुळे शिवसेनेचे नेते तथा आमदार हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. शेतकरी कुटुंबातून जन्मास आलेल्या आनंदराव हे अगदी तरुण वयापासूनच शिवसेनेच्या हिंदुत्ववादी विचारसरणीने भारावले होते .हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे , धर्मवीर आनंद दिघे यांची हिंदुत्ववादी विचारसरणी अंगीकरताना शिवसेना पक्षप्रमुख एकनाथजी शिंदे आणि शिवसेना नेते नामदार हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या राजकारणात त्यांचा यशाचा आलेख दिवसेंदिवस चढत गेला आणि लोककल्याणाच्या कामाची पावती म्हणून नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना प्रचंड मतांनी विजयी केले.



आ. आनंदराव बोंढारकर यांनी आपले राजकीय जीवन सुरू केल्यापासून शेतकऱ्यांच्या समस्या हे केंद्रस्थानी ठेवले आहे. नांदेड जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा असल्याने येथे सतत दुष्काळ, अपुरा पाणीपुरवठा, हमीभावाचा अभाव, वीजपुरवठ्याच्या अडचणी अशा अनेक समस्यांनी शेतकरी त्रस्त आहे. अशा परिस्थितीत बोंढारकर यांनी शेतकऱ्यांसाठी विविध पातळ्यांवर आवाज उठवला आहे. विधानसभेतही शेतकरी हिताचे प्रश्न मांडले. नांदेड दक्षिण मतदारसंघातील अनेक गावांमध्ये टंचाईच्या प्रश्नावर जलसंधारण योजना आणि जलयुक्त शिवार योजनेतून ठोस कामगिरी.अनेक गावे टंचाईमुक्त केली. ग्रामीण भागातील माय माऊलींची पाण्यासाठीची भटकंती थांबवली. एवढेच नाही तर शेतकऱ्यांच्या वीजबिल माफी व सवलत यासाठी पाठपुरावा केला. ऊर्जामंत्री व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क करून वीजबिल कमी करण्यासाठी प्रयत्न केले. शेतीसाठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आ. बोंढारकर प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचे वाटप वेळेत होण्यासाठी जिल्हा प्रशासनावर दबाव टाकला. विधानसभेतही त्यांनी आवाज उठवला.त्यामुळे खऱ्या अर्थाने ते लोकसेवक ठरले आहे.

निष्कलंक चरित्र मान्यता म्हणूनही आमदार आनंदराव भांडारकर यांच्याकडे पाहिले जाते. जिल्हाप्रमुख पदापासून ते आमदारकीपर्यंत मजल मारणाऱ्या आ. बोंढारकर यांच्यामध्ये कधीही गर्व, अहंकार जाणवला नाही . सर्वच घटकातील मित्रांसोबत अत्यंत सौजन्य पूर्ण व्यवहार करणाऱ्या बोंढारकर मित्र मंडळाचा वर्ग ही प्रचंड मोठा आहे . पक्षाच्या बाहेर जाऊन अनेक राजकीय पक्षातही त्यांचे स्नेह संबंध राहिले आहेत. त्यामुळे एक सर्व समावेशक नेतृत्व म्हणूनही आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडे पाहिले जाते. सर्वच जाती घटकाला सोबत घेऊन चालताना शेवटच्या घटकाचा विकास झाला पाहिजे यासाठी आत्मीय तळमळीने काम करणाऱ्या आ. आनंदराव बोंढारकर यांचा वाढदिवस म्हणजे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील तमाम जनतेचा आनंद उत्सवच आहे . एवढेच नाही तर नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या लेकराचा हा वाढदिवस असल्याने आजचा वाढदिवस अत्यंत आनंददायी असा आहे. शेतकऱ्यांसाठी , लोकसेवेसाठी आणि लोककल्याणासाठी आ. आनंदराव बोंढारकर यांना दीर्घ आयुष्य मिळो . निरोगी आरोग्य मिळो हीच गुरुचरणी प्रार्थना.

**स. दर्शनसिंग सिद्धू**
**सह संपर्कप्रमुख, शिवसेना नांदेड**